रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १५८
www.ramprahar.com
◆ गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

रोहा तालुक्यात बिबट्या आल्याच्या अफवा सुरूच/२
पाले बुद्रुक येथे विविध विकासकामांचा शुभारंभ/३
पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडला तीन रौप्यपदके/८

## ‘नवी मुंबई विमानतळाला ‘दिबां’चे नाव लवकरच देणार’



**मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्यापासून कार्यान्वित होत असताना, या विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारकडे पाठवला असून तो प्रस्ताव सध्या केंद्र सरकारकडे अ‍ॅक्टिव्हली विचाराधीन असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. बुधवारी पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकनेते दि.बा. पाटील यांनी नवी मुंबई, रायगड, ठाणे व परिसराच्या विकासासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि सामान्य जनतेच्या हक्कांसाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. त्यामुळे केंद्र सरकारकडून या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल आणि लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे अधिकृत नामकरण होईल.

# अस्तित्वासाठी दोन पक्षांची केविलवाणी धडपड -मुख्यमंत्री

### उबाठा-मनसेच्या युतीवरून टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उबाठा आणि मनसेची अधिकृत युती जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या युतीवर तिखट टीका केली आहे. ही युती म्हणजे दोन अस्तित्वहीन पक्षांनी स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी केलेली केविलवाणी धडपड आहे. या पलीकडे याचा दुसरा अर्थ काढण्याचे कारण नाही.

मंत्रालयात माध्यमांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले, उबाठाने मुंबईकरांचा सातत्याने विश्वासघात केला आहे. मराठी माणसाला मुंबईबाहेर घालवण्याचे पाप त्यांनी केले. अमराठींवर हल्ले केले, त्यामुळे तेही त्यांच्यासोबत नाहीत. मुंबईत कोणीही ठाकरे बंधूंसोबत येणार नाही. त्यांचा ट्रॅक रेकॉर्ड फक्त भ्रष्टाचार आणि स्वहिताचा आहे. निवडणुका आल्या की भावनिक बोलतात, पण आता जनता त्यांना भुलणार नाही. मुंबईकरांनी महायुतीने केलेला विकास पाहिला आहे. विशेषतः मराठी माणसाला मुंबईत हक्काची घरे देण्याचा कार्यक्रम आम्ही हाती घेतला आहे. त्यामुळे मुंबईची जनता विकासावर महायुतीलाच कौल देईल. ठाकरे बंधूंची युती प्रीतिसंगम नव्हे, तर भीतीसंगम आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

हिंदुत्वाच्या मुद्द्यावरही फडणवीसांनी ठाकरेंना लक्ष्य केले. आमचे हिंदुत्व व्यापक आहे, भारतीय जीवनपद्धतीवर आधारित आहे. प्रभू श्रीरामांना मानणाऱ्यांना आम्ही सोबत घेतो, त्यांची जात-धर्म पाहत नाही. पलटी मारणाऱ्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवू नये, असा घणाघात त्यांनी केला.

# नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत कार्यवाहीचे निर्देश

### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणी व पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यामधील सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या समस्येबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष वेधून सिडकोने घनकचरा व्यवस्थापन करावे, अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिडकोमार्फत नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत तत्काळ कार्यवाही करून त्यासंबंधी प्रस्ताव तयार करण्याचे आणि तो प्रस्ताव तत्काळ मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तालुक्यातील ४६ गावांचा घनकचरा



व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागणार असून यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे.

ग्रामीण भागातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी मागणी करून या विषयावर शासनाचे लक्ष केंद्रित केले होते. पनवेल तालुक्यातील अनेक ग्रामपंचायती सिडको व नैना अधिसूचित क्षेत्रात येतात. या भागात निवासी, औद्योगिक व वाणिज्यक विकास मोठ्या प्रमाणावर वाढल्याने लोकसंख्या आणि स्थलांतर वाढले आहे. परिणामी कचरा निर्मितीही प्रचंड प्रमाणात होत आहे. नैना अधिसूचित क्षेत्रात एकूण ४६ गावांचा समावेश असून, या सर्व ग्रामपंचायतींच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर घनकचरा निर्माण होत आहे. सध्या ग्रामपंचायती कचरा संकलन करतात, मात्र आर्थिक, तांत्रिक साधनसामग्री व मनुष्यबळाच्या अभावामुळे शास्त्रीय पद्धतीने कचरा प्रक्रिया करणे शक्य होत नाही.

कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणे व चालवणे ग्रामपंचायतींसाठी खर्चिक आहे. म्हणून सिडको-नैना अधिसूचित क्षेत्रातील ग्रामीण भागात निर्माण होणारा कचरा सिडकोच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामार्फत प्रक्रिया करणे आवश्यक आहे. प्रक्रिया व वाहतूक खर्च ग्रामपंचायतींना परवडणारा नसल्याने सिडकोने ग्रामपंचायतींसोबत करार करून प्रक्रिया खर्च माफ केल्यास आणि **(पान २ वर..)**

## विजयी उमेदवारांचे अभिनंदन



**पनवेल : उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांनी एकूण २१ जागांपैकी १२ जागांवर विजय मिळवून नगर परिषदेत सत्ता स्थापनेसाठी मजबूत बहुमत सिद्ध केले आहे. सर्व नवनिर्वाचित उमेदवारांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत आशीर्वाद घेतले. या वेळी आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक कौशिक शाह यांच्यासह विजयी उमेदवार रविशेठ भोईर, सायली म्हात्रे, जविंद्र कोळी, रंजना कोळी, रिबेका मढवी, जसीम गॅस, पूर्वा वैवडे, रोहित पाटील, गणेश पाटील, सायली पाटेकर, राजेश ठाकूर आणि दमयंती म्हात्रे उपस्थित होते.**

# इटलीने बंदी घातलेल्या रसायनांचे कोकणात उत्पादन

**■ लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेडच्या ‘उद्योगा’मुळे नागरिकांमध्ये घबराट**

**■ उद्योगमंत्र्यांच्या वक्तव्यांनी संभ्रम; संबंधितांची वैद्यकीय चाचणी करण्याची मागणी**



**महाड : प्रतिनिधी**

इटली या देशाने लोकहितासाठी बंद केलेली रासायनिक कंपनी आता लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीने कोकणात सुरू केल्याने जनतेमध्ये घबराट पसरली आहे. दरम्यान, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून या कारखान्याला नोटीस बजावण्यात आली असल्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितल्याने जनतेमध्ये आणखी संभ्रम निर्माण झाला आहे.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, लक्ष्मी ऑरगॅनिकने इटलीतील कारखाना आणि तेथील यंत्रसामग्री विकत घेतली आणि त्यामधील जे रसायन होते ते तळोजा येथे नष्ट करण्यास पाठवली. शिवाय या कंपनीच्या उत्पादनाबाबत सर्वच केंद्र आणि राज्याच्या लागणाऱ्या परवानग्या त्यांनी घेतलेल्या आहेत. कोकणाला त्रास होईल असा कोणताच कारखाना येऊ दिला जाणार नाही, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

इटलीमधील मायटेन येथे पीएफएएस केमिकल अर्थात फोरएव्हर केमिकल निर्माण करणाऱ्या एका कंपनीला इटलीमध्ये बंदी घालण्यात आली आहे. तसेच घातक रसायन निर्मिती प्रकरणी या कंपनीच्या प्रशासनावर तेथे गुन्हेही दाखल करून अटक केली होती. **(पान २ वर..)**





# भाजपच्या कोकणातील प्रभावी महिला नेतृत्वाचा ठसा उमटविणारे नेतृत्व म्हणजे नगराध्यक्ष प्रितम पाटील

## पेण नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाच्या विजयाची हॅट्ट्रिक

(प्रथम २०११, व्दितीय २०१६ व तृत्तीय २०२५)

**विशेष प्रतिनिधी**

कोकणातील भाजपच्या प्रभावी महिला नेतृत्वामध्ये पेण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रितम ललित पाटील यांचे नाव आज अग्रक्रमाने घेतले जाते. सातत्यपूर्ण विजयाची हॅटट्रिक साधणाऱ्या प्रितम पाटील यांनी केवळ निवडणुकांमध्ये यश मिळवले नाही, तर आपल्या कार्यकर्तृत्वाच्या बळावर पेणकर जनतेच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे.

गेल्या पंधरा वर्षांच्या कालखंडात त्यांनी राबवलेल्या विविध विकासकामांमुळे, प्रभावी प्रशासनामुळे आणि जनतेशी असलेल्या थेट संवादामुळे त्यांनी स्वतःला एक विश्वासार्ह, कर्तव्यदक्ष आणि लोकाभिमुख नेतृत्व म्हणून सिद्ध केले आहे. याच काळात पेण नगरपरिषदेवर भाजपचे भक्कम वर्चस्व प्रस्थापित झाले, हे विशेष उल्लेखनीय आहे.
दक्षिण रायगड जिल्ह्यात भाजपचा एकमेव झेंडा रोवण्याचे श्रेय आमदार रविशेठ पाटील यांना जात असले, तरी पेण विधानसभा मतदारसंघात भाजपला सातत्याने आघाडी मिळवून देण्यात नगराध्यक्षा प्रितम पाटील यांची भूमिका निर्णायक ठरली आहे. लोकसभा निवडणुकीत खासदार सुनील तटकरे यांना पेण मतदारसंघातून मोठी आघाडी मिळवून देण्यात त्यांचे नियोजन, कार्यकर्त्यांचे संघटन आणि जनसंपर्क मोलाचा ठरला. तसेच विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने पक्षश्रेष्ठींनाही प्रभावित केले होते.
अलीकडील नगरपरिषद निवडणुकीत तब्बल ५,८६१ मतांच्या फरकाने मिळालेला तिसरा विजय हा केवळ आकड्यांचा खेळ नसून तो त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाचा, सातत्यपूर्ण परिश्रमांचा आणि मजबूत संघटनशक्तीचा स्पष्ट दाखला आहे.
२०१० साली नगरसेवक म्हणून निवडून आल्या. त्यानंतर २०११ साली त्यांनी प्रथमच नगराध्यक्षा पदाची सूत्रे हाती घेतली. जनतेशी असलेला जिव्हाळा, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि लोकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याच्या भूमिकेमुळे अल्पावधीतच त्यांनी जनतेशी नाळ जोडली. परिणामी २०१६ मध्ये त्यांना दुसऱ्यांदा सर्वसाधारण गटात नगराध्यक्षा पदाची माळ जनतेने घातली. दुसऱ्या कार्यकाळात त्यांनी विकासकामांचा वेग वाढवला तसेच पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी अथक मेहनत घेतली. याच कामगिरीमुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत आमदारकीसाठी त्यांचे नाव चर्चेत आले होते.

कोरोना महामारीच्या कठीण काळात त्यांनी दाखवलेले कार्य विशेष कौतुकास्पद ठरले. अन्नधान्य वाटप, गरजू नागरिकांना मदत, तसेच पूरस्थितीत पायाला भिंगरी



लावून भर पावसात पूरग्रस्तांच्या मदतीसाठी धाव घेणारी नगराध्यक्षा म्हणून त्यांची प्रतिमा अधिक ठळक झाली. महिलांसाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. उत्कृष्ट वक्तृत्व, दांडगा जनसंपर्क आणि आमदार रविशेठ पाटील यांची पर्वतासारखी साथ त्यांना लाभली. ‘सून नाही तर मुलीप्रमाणे’ प्रेम आणि विश्वास देत त्यांनी त्यांना नेहमीच बळ दिले. याच सकारात्मक नेतृत्वाच्या समन्वयातून नगरपरिषद निवडणुकीत विजयाची हॅटट्रिक साध्य झाली.

भाजपकडून जिल्हास्तरावर कोणतेही मोठे पद न मिळाले तरीही प्रितम पाटील यांनी जोमाने पक्षसंघटना वाढवण्याचे काम सुरू ठेवले. नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होत, सातत्याने थेट संपर्क ठेवत त्यांनी लोकनेतृत्वाची ठळक ओळख निर्माण केली आहे.

पेण नगरपरिषदेच्या निकालांनी शहराच्या राजकारणातील दिशा स्पष्ट केली असून, पेणकर जनतेचा कौल हा प्रितम पाटील यांच्या नेतृत्वावरचा विश्वास आजही भक्कम असल्याचे अधोरेखित करतो.

advt.




# मंत्रिमंडळात निर्णयांचा धडाका

## ■ नगराध्यक्षांची ताकद वाढली;
## ■ आता मिळणार मतदानाचा अधिकार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत जनसामान्यांच्या हिताचे आणि प्रशासकीय सुधारणांचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये आरोग्य सेविकांचे प्रश्न मार्गी लावण्यापासून ते नगरपरिषदेच्या कारभारात बदल करण्यापर्यंतच्या अनेक तरतुदींना मंजुरी देण्यात आली आहे.



**१. थेट निवडून आलेल्या नगराध्यक्षांची ताकद वाढली**

नगरविकास विभागाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या निर्णयानुसार, आता थेट जनतेतून निवडून आलेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या अध्यक्षांना सभागृहाचे रितसर सदस्यत्व मिळणार आहे. इतकेच नव्हे, तर त्यांना आता सभागृहात मतदानाचाही अधिकार असेल. या सुधारणेसाठी सरकार लवकरच अध्यादेश काढणार असून, यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रमुखांना प्रशासकीय कामात अधिक अधिकार प्राप्त होतील.

**२. आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित होणार**

ग्रामविकास व पंचायत राज विभागातर्फे राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या आणि सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित आरोग्य सेविकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला त्यांच्या नियुक्त्या नियमित करण्याचा प्रश्न आता सुटला आहे. यामुळे हजारो आरोग्य सेविकांना मोठा आर्थिक आणि सेवाविषयक लाभ मिळणार आहे.

**३. 'जिल्हा कर्मयोगी २.०' आणि 'सरपंच संवाद'**

प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि सक्षम करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने 'जिल्हा कर्मयोगी २.०' आणि 'सरपंच संवाद' हे कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे ग्राम, तालुका आणि जिल्हा स्तरावरील प्रशासकीय यंत्रणेत समन्वय वाढेल. तसेच सरपंचांशी थेट संवाद साधून गावपातळीवरील समस्या तातडीने सोडवण्यावर भर दिला जाणार आहे.

**४. धाराशिवमध्ये अण्णाभाऊ साठे यांचा भव्य पुतळा**

साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक आणि पुतळा उभारण्यासाठी धाराशिव शहरात दुग्धव्यवसाय विकास विभागाची एक एकर जागा महसूल विभागाकडे हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामुळे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्याच्या मागणीला यश आले आहे.

# पथनाट्याच्या माध्यमातून जिल्ह्यात एड्स नियंत्रण जनजागृती मोहीम

**अलिबाग,: रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, वडाळा, मुंबई येथील प्रकल्प संचालक तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात एचआयव्ही/एड्स जनजागृतीसाठी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे.



या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील एकूण १५ ठिकाणी दोन कलापथकांच्या माध्यमातून दिनांक २४ ते २७ डिसेंबर २०२५ या कालावधीत एचआयव्ही/एड्स विषयक जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. शाहीर पांडुरंग हनुमंत गवळी व सहकारी, सांगली यांच्या माध्यमातून पोलादपूर (शिवाजी चौक), महाड (बाजारपेठ), माणगांव (एस.टी. स्टॅन्ड), म्हसळा (प्राथमिक आरोग्य केंद्र), श्रीवर्धन (एस.टी. स्टॅन्ड), मुरूड-जंजिरा (समुद्रकिनारा) व रोहा (एस.टी. स्टॅन्ड) येथे पथनाट्ये सादर करण्यात येणार आहेत. तर शाहीर आलम रमजान पाटवेगार, सांगली यांच्या माध्यमातून अलिबाग (आंबेडकर चौक), पेण (एस.टी. स्टॅन्ड), खोपोली (शिळफाटा), पाली-सुधागड (प्राथमिक आरोग्य केंद्र), पनवेल (एस.टी. स्टॅन्ड), उरण (एस.टी. स्टॅन्ड), कशेळे (ग्रामीण रुग्णालय) व कर्जत (रेल्वे स्टेशन) येथे कार्यक्रम होणार आहेत.

दि. २४ डिसेंबर रोजी अलिबाग येथील आंबेडकर चौकात शाहीर आलम रमजान पाटवेगार यांच्या पथनाट्याद्वारे एचआयव्ही/एड्स म्हणजे काय, त्याची कारणे, लक्षणे, समज-गैरसमज, २०१७ चा कायदा, आयसीटीसी केंद्रे, टोल फ्री क्रमांक १०९७ तसेच NACO ॲप याविषयी लोकगीतांच्या माध्यमातून प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

यावेळी एचआयव्ही संसर्ग होण्याचे चार प्रमुख मार्ग स्पष्ट करण्यात आले. त्यामध्ये असुरक्षित लैंगिक संबंध, एचआयव्ही संसर्गित व्यक्तीचीच सुई व सिरिंजचा वापर, संसर्गित रक्त देण्यात आल्यास तसेच एचआयव्ही बाधित पालकांकडून होणाऱ्या बाळाला संसर्ग होण्याची शक्यता यांचा समावेश आहे. प्रत्येक नागरिकांनी व विशेषतः गरोदर मातांनी शासकीय दवाखान्यातील आयसीटीसी समुपदेशन व तपासणी केंद्रातून एचआयव्हीची तपासणी करून घ्यावी, नेहमी नवीन सुईचा वापर करावा, रक्ताची गरज भासल्यास प्रमाणित रक्तपेढीतूनच रक्त घ्यावे तसेच एचआयव्ही संसर्ग आढळल्यास मोफत उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले.या कार्यक्रमास जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, आयसीटीसी समुपदेशक कल्पना गाडे, उपस्थित होते.

# रोहा तालुक्यात बिबट्या आल्याच्या अफवा सुरूच

**◆ खारी येथील एआय फोटो व्हायरल करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करणार : विभागाची माहिती**

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील विविध भागांमध्ये बिबट्या आढळल्याच्या बातम्या गेल्या अनेक दिवसांपासून व्हॉट्सपच्या माध्यमातून सातत्याने व्हायरल होत आहेत. कधी एका जंगलात तर कधी दुसऱ्या ठिकाणी बिबट्या दिसल्याचे संदेश सोशल मीडियावर पसरवले जात असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र आज वनविभागाने या सर्व अफवांबाबत अधिकृत स्पष्टीकरण देत रोहा तालुक्यात अद्याप कुठेही बिबट्या आढळलेला नाही, असे स्पष्ट केले आहे.



वनविभागाकडून माहिती देताना सांगण्यात आले की, सध्या सोशल मीडियावर फिरत असलेले फोटो व संदेश हे खोटे व दिशाभूल करणारे आहेत. विशेषतः खारी येथील असल्याचे सांगत जो फोटो व्हायरल झाला, तो एआयच्या माध्यमातून तयार करण्यात आलेला असून तो व्हायरल करणाऱ्या व्यक्तीवर सायबर गुन्हे सेलमध्ये गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती तालुका वनविभागाचे मुख्य अधिकारी दबडे यांनी दिली.

दरम्यान, वनविभागाने नागरिकांना योग्य दृष्टीकोन ठेवण्याचे आवाहन करत सांगितले की, बिबट्या आढळणे ही भीतीची नव्हे तर पर्यावरणीय दृष्ट्या सकारात्मक बाब आहे. बिबट्याची उपस्थिती म्हणजे निसर्गातील अन्नसाखळी व जैवविविधतेचे संवर्धन टिकून असल्याचे द्योतक असून वन्यजीवांचे संरक्षण अधिक सक्षम असल्याचे सूचित करते. तसेच, रोहा तालुक्यातील ऐनवल येथे बैलाचा मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यामुळे झाल्याची बातमीही व्हायरल झाली होती, मात्र या घटनेत बिबट्याचा सहभाग असल्याचे अद्याप सिद्ध झालेले नाही, अशी माहिती वनविभागाने दिली असून या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. संबंधित शेतकऱ्याला वनविभागाच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यात येईल, असेही आश्वासन देण्यात आले आहे.

वनविभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतेही अप्रमाणित फोटो किंवा संदेश पुढे पाठवू नयेत. खोटी माहिती पसरवणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# तुर्भे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा.आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ.राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने तुर्भे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागाअंतर्गत सेक्टर १७,सानपाडा, नवी मुंबई येथील मोकळया भुखंडावरील नवीन अनधिकृत झोपडया हटविण्यासाठी दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते.

त्यानुसार, दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी कारवाई करुन



अंदाजे ०८ अनधिकृत झोपडया हटविण्यात आलेल्या आहेत. सदर मोहिम तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे तसेच तुर्भे विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांचे उपस्थितीमध्ये करण्यात आली आहे.तसेच सदर मोहिमेसाठी अतिक्रमण निर्मुलन पथकातील पोलीस अधिकारी/ अंमलदार आणि अतिक्रमण विभागातील सुरक्षारक्षक देखील तैनात ठेवण्यात आले होते.या पुढे देखील अतिक्रमण विरोधी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

# शाळांच्या भिंतींवर राजकीय बॅनर; पालकवर्गात नाराजी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील काही शाळांच्या भिंतींवर सध्या विविध राजकीय पक्षांकडून अभिनंदन व आभार व्यक्त करणारे बॅनर झळकत असल्याने पालकवर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शिक्षणाचे पवित्र स्थान असलेल्या शाळांवर राजकीय प्रचाराचे फलक लावले जात असल्याने विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे.

कर्जत नगर परिषद हद्दीत गेल्या काही वर्षांपूर्वी अनधिकृत होर्डिंगविरोधात मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली होती. शहर विद्रूप होऊ नये यासाठी अनेक ठिकाणचे होर्डिंग काढून टाकण्यात आले होते. मात्र सध्या पुन्हा शहरातील चौकाचौकांत राजकीय पक्षांचे बॅनर लागलेले दिसून येत आहेत. यामध्ये थेट शाळांच्या भिंतींवरही राजकीय पक्षांनी जागा घेतल्याचे चित्र आहे. विशेषतः कर्जत प्रशासकीय भवनाजवळील अभिनव ज्ञानमंदिर प्रशाला, शारदा मंदिर, शिशु मंदिर शाळेच्या परिसरात ही स्थिती दिसून येत आहे.

**'शहरातील अनधिकृत होर्डिंग आणि बॅनर फ्रेम बाबत संबंधितांना नोटिसा पाठवून कारवाई करण्यात येईल. नगरपरिषद हद्दीत केवळ परवाना धारक बॅनर लावण्यास परवानगी आहे.'**

**तानाजी चव्हाण,**
**मुख्याधिकारी कर्जत नगरपरि**

या शाळांमध्ये बालवर्गापासून ते महाविद्यालयीन शिक्षण घेणारे हजारो विद्यार्थी तालुक्याभरातून दररोज येत असतात. पालकांचे म्हणणे आहे.

# महिला उद्योजकता विकासासाठी वाशीमध्ये चर्चासत्राचे आयोजन



**नवी मुंबई : बातमीदार**

जनकल्याण महिला सहकारी संस्था व सहकार भारती आयोजित महिलांसाठी उद्योजकता विकास यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन या ठिकाणी दिनांक २३ डिसेंबर २०२५ मंगळवार रोजी दुपारी एक ते पाच या दरम्यान करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाचे आयोजनामध्ये जया अलीमचंदाणी, सौ कल्पना छत्रे, मॅक्रीन सालडाणा सहकार भारती नवी मुंबई मार्फत महामंत्री श्री संतोष मिसाळ उदय कुमार तांदळे सुनील सावंत आबा रणवरे रश्मी सपकाळ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना जया अलीमचंदाणी यांनी महिलांसाठी करत असलेल्या अनेक उपक्रमा संबंधी सांगितले त्यामध्ये महिला उद्योजकांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रदर्शनाचे आयोजन संस्थेमार्फत केले जाते. महिला उद्योजकांना अनेक उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते. महिला सक्षमीकरणासाठी नवी मुंबई जनकल्याण महिला नागरी संस्था नेहमीच कार्यरत असते.

सदर कार्यक्रमांमध्ये शितल पांचाळ यांनी आपल्या उत्पादनाचे ब्रँडिंग कशाप्रकारे करायचे या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. सुनील खुजणारे उपसंचालक महाराष्ट्र शासन मुंबई विभाग यांनी सरकार महिला उद्योजकतेसाठी करत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

## पान १ वरुन

### नैना अधिसूचित क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत कार्यवाहीचे निर्देश

कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारल्यास ग्रामीण भागात आदर्श घनकचरा व्यवस्थापन शक्य होईल, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला सूचित केले होते. त्या अनुषंगाने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

या पार्श्वभूमीवर सिडकोकडून संबंधित ग्रामपंचायतींना प्रत्येक गावाची लोकसंख्या, दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे प्रमाण तसेच सद्यस्थितीत त्या कचऱ्याचे व्यवस्थापन कशा पद्धतीने केले जाते, याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या विषयावर सविस्तर चर्चा व पुढील कार्यवाहीसाठी मंगळवार, ३० डिसेंबरला दुपारी २ वाजता बेलापूर सिडको भवन येथे बैठक होणार असून एकात्मिक व शास्त्रीय पद्धतीने कचरा व्यवस्थापन होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### इटलीने बंदी घातलेल्या रसायनांचे कोकणात उत्पादन

या कारखान्यातून निर्माण होणाऱ्या घातक रसायनांच्या प्रभावाने येथील मनुष्यांच्या शरीरात पीएफएस या रसायनाचे केमिकलचे आठ नॅनोग्राम पेक्षा वाढून प्रमाण ९१ हजार नॅनोग्राम एवढे झाले आहे. त्यामुळे इटलीच्या परिसरातील जवळपास साडेतीन लाख लोक या केमिकलच्या प्रभावाने ग्रस्त झाली आहेत. या प्रकरणी इटली सरकारने सदर कारखाना बंद करून कारखानाचालकांवर गुन्हा दाखल केला आणि त्यांना अटक केली, मात्र भारतातील विवा लाईफ सायन्स या कंपनीने या कारखान्याचे ते साहित्य खरेदी करून ते कोकणातील लक्ष्मी ऑरगॅनिक या कंपनीत स्थापन केल्याची चर्चा सोशल माध्यमातून पुढे आली आहे.

महाड औद्योगिक वसाहतीत घातक रसायन उत्पादक करणाऱ्या काही कंपन्या कायम वादात राहिल्या आहेत, मात्र तरीही दस्तुरखुद्द उद्योग मंत्री उदय सामंत यांना स्पष्ट केले कि, 'या कंपनीमुळे असा कोणताही धोका कोकणाला नाही त्यामुळे सोशल मिडीवरून या चर्चा थांबवाव्यात'. लोटे या ठिकाणी हा कारखाना काही महिन्यांपूर्वी सुरू झालेला आहे. या कारखान्यासह इतर कारखान्यांनीही त्यांच्या परिसरात राहणाऱ्या लोकांची रक्त लघवी आणि संबंधित सर्व प्रकारची वैद्यकीय तपासणी करावी. त्यामुळे आरोग्यदृष्ट्या सर्व बाबी स्पष्ट होतील, अशी मागणी जनतेकडून केली जात आहे. लक्ष्मी ओरगॅनीक कंपनी आणि त्यांच्यामार्फत रसायन निर्मितीची चाचणी महाडमध्ये झाल्याची चर्चा होत असल्याने महाड मध्ये देखील भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोकणामध्ये या घातक रसायनाचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग झाल्यास कोकणाचे नैसर्गिक व जैविक अस्तित्व धोक्यात येईल, अशी भीती निर्माण झाली होती. लक्ष्मी ओरगॅनिक कंपनीचे कोकणात महाड आणि लोटे याठिकाणी कारखाने आहेत. महाड आणि लोटे या दोन्ही ठिकाणी एकाच कंपनीचे कारखाने असले तरी दोन्हीकडे उत्पादन मात्र वेगवेगळे असल्याचे समजते. याप्रकरणी महाड येथील लक्ष्मी ऑरगॅनिक कारखान्यातील व्यवस्थापकांजवळ संपर्क साधला असता त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारे समाधानकारक उत्तर मिळाले नाही, मात्र सदर केमिकलबाबत आम्हाला कोणती माहिती नाही व त्याची निर्मिती महाड येथील युनिटमध्ये होत नसून याप्रकरणी लोटे येथील कारखान्यांमध्ये जर याची निर्मित होत असल्यास आपल्याला याबाबत माहीत नाही, अशी भूमिका कारखाना व्यवस्थापकांनी घेतली.

कंपनीच्या अन्य एका जबाबदार व्यक्तीने नाव न छापण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, इटलीमध्ये एका कारखान्याने हे केमिकल नदीत सोडून दिले होते. त्या पाण्यामुळे तेथील मानवी शरीरात हे केमिकल मोठ्या प्रमाणावर आढळून आले. त्यामुळे इटली सरकारने ही कंपनी आणि तेथील उत्पादन बंद केल्याचे सांगितले.

भारतामध्ये किंवा महाराष्ट्रात परवाने दिल्यानंतर कंपन्या काय करतात आणि परवान्यानुसार काम करतात का, याची चौकशीच केली जात नाही. यामुळे परवाना एका उत्पादनाचा आणि प्रत्यक्षात वेगळेच उत्पादन, असे प्रकार यापूर्वी अनेकदा समोर आले आहेत. महाड औद्योगिक क्षेत्रामध्ये काही महिन्यांपूर्वी एका कारखान्यावर कारवाई झाली असता तेथील उत्पादनांमध्ये ड्रग्ज आढळून आले होते.

# धनंजय बोडारेंचा भाजपत प्रवेश

**उल्हासनगर : प्रतिनिधी**

उल्हासनगरात उद्धवसेनेला जिवंत ठेवणारे कल्याण जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे यांनी तीन माजी नगरसेवक व सहकाऱ्यासह भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थिती मुंबई पक्ष कार्यालयात प्रवेश झाला.

उल्हासनगर शिवसेना म्हणजे बोडारे बंधू असे समीकरण झाले होते. कलानी विरुद्ध बोडारे असा सामना शहरवासीयांनी बघितला आहे. शिवसेनेच्या फुटीनंतर उद्धवसेना मजबूत करण्याचे काम बोडारे बंधू यांनी केले. जिल्हाप्रमुख पदी राहिलेले चंद्रकांत बोडारे यांनी विधानसभा निवडणूकीपूर्वी शिंदेसेनेत प्रवेश केला. तर लहान बंधू असलेले धनंजय बोडारे यांची शहरप्रमुख पदावरून कल्याण जिल्हाप्रमुख पदी बढती झाली. दरम्यान पर्यावरणवादी सरिता खानचंदानी यांच्या आत्महत्या प्रकरणी धनंजय बोडारे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यावर त्यांच्यावर अटकेची तलवार लटकली होती. ऐन महापालिका निवडणुकी दरम्यान कोणताही अडसर नको म्हणून धनंजय बोडारे यांनी धर्मपत्नी व माजी नगरसेवक वसुधा बोडारे, माजी नगरसेविका शीतल बोडारे, ओमी टीमच्या माजी नगरसेविका आशा नाना बिऱ्हाडे यांच्यासह सहकार्यांनी भाजप मुंबई कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थित प्रवेश केला.

## दुखवटा

### वत्सला अधिकारी




**माणगाव :** माजी नगराध्यक्षा योगिता चव्हाण यांच्या मोतोश्री कै.वत्सला गजानन अधिकारी यांचे बुधवार दि. २४ डिसेंबर रोजी त्यांच्या राहते घरी साई कोंड ता.माणगाव येथे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय – ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात चार मुली,जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि. २ जानेवारी रोजी तर उत्तरकार्य विधी रविवार दि.४ जानेवारी २०२६ रोजी राहते घरी साई कोंड ता.माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे जावई पुंडलिक गायकवाड यांनी सांगितले.

### बाबीबाई गायकवाड



**चौक :** बाबीबाई काशिनाथ गायकवाड रा.कुंभिवली यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले.बालविवाह झाल्यावर अल्पावधीत त्यांच्यावर वैधव्य आले. वारकरी संप्रदाय असल्याने त्यांनी ज्ञानेश्वरी वाचन सुरू केले.संपूर्ण ज्ञानेश्वरी तोंड पाठ होती,त्यांचा दशक्रिया विधी ३१ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र धाकटी पंढरी, साजगाव येथे व उत्तरकार्य शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी कुंभिवली येथे होणार आहेत.

### लक्ष्मीबाई भोईर



**पनवेल :** तालुक्यातील सावळे येथील लक्ष्मीबाई आंबो भोईर यांचे वृद्धापकाळाने वयाच्या १०६ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा व आप्तेष्टांनी भरलेला परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दिनांक ३१ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार असून उत्तरकार्य शनिवार दिनांक ०३ जानेवारी रोजी सावळे येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

### नामदेव मुकादम



**नवी मुंबई :** ज्येष्ठ पखवाज वादक नामदेव शंकर मुकादम ( ६८ ) यांचे मंगळवारी अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. नामदेव मुकादम यांच्या पार्थिवावर पावणे गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी भजन क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### बसमध्ये चढताना मोबाईल चोरला

**पनवेल :** रेल्वे स्थानकाबाहेर एनएमएमटी बसथांब्यावरून चढताना २३ वर्षीय तरुणाचा ५० हजार रुपये किमतीचा आयफोन चोरल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहित सूर्यवंशी हा नॅशनल रेजन्सी, तक्का येथे राहत असून, कॉलेजला जाण्यासाठी पनवेल रेल्वे स्थानकात आला. मेगाब्लॉक असल्याने पनवेल-ठाणे बस पकडताना गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्याने त्याच्या खिशातील मोबाईल पळविला. त्याने तक्रार केल्यावर बस कामोठे पोलीस ठाण्यात नेण्यात आली. पोलिसांनी बसमधील प्रवाशांना तपासले असता, मोबाइल सापडला नाही.

### नरेंद्र गायकवाड निवडणूक निरीक्षकपदी

**पनवेल :** आगामी पनवेल महापालिका निवडणुकीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) सक्रिय झाली असून निवडणुकीच्या नियोजनासाठी आणि महायुतीमधील समन्वयासाठी पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र चंद्रकांत गायकवाड यांची निवडणूक निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे कोकण प्रदेशाध्यक्ष प्रकाश मोरे यांनी या निवडीची अधिकृत घोषणा केली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष या निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी उतरणार आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व पदाधिकारी, शहर अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांनी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षबांधणी अधिक मजबूत करावी, असे कोकण प्रदेशाध्यक्ष मोरे यांनी सुचित केले आहे.

### प्रशांत सोनवणे यांची निवड

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीच्या पनवेल शहर अध्यक्षपदी प्रशांत सोनवणे यांची निवड करण्यात आली असून त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशांत सोनवणे यांची पनवेल शहर अध्यक्षपदी निवड केली आहे व तशा प्रकारचे नियुक्तीपत्र त्यांनी प्रशांत सोनवणे यांना दिलेले आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीतून

# पाले बुद्रुक येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून गावाच्या सर्वांगीण विकासाकरिता निधी आणण्याचे काम आम्ही करतो, मात्र राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहचवणे आणि त्यांच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वीकारावी, असे प्रतिपादन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पाले बुद्रुक येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीतून करण्यात येणाऱ्या ग्रामीण भागातील विविध विकासकामांच्या शुभारंभावेळी केले.

आगामी जिल्हा परिषद निवडणुकांचे रणशिंग फुंकत, प्रचाराची धुरा प्रभावीपणे सांभाळून वावंजे जिल्हा परिषदेवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकवा, असे आवाहनही कार्यकर्त्यांना केले. पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनेवल तालुक्यातील पाले बुद्रुक गावाचा कायापालट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला असून बुधवारी या परिसरात विविध कामांचा लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळा उत्साहात झाला. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एक कोटी ५० लाख रुपयांच्या अर्थसंकल्पीय निधीतून साकारलेल्या साकव-३ या मोठ्या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. त्याचप्रमाणे पालेश्वरी मंदिर ते लक्ष्मण उलवेकर यांच्या घरापर्यंतचा रस्ता, कर्शनी विहार येथील अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण, कर्शनी विहार ते प्रशांत म्हात्रे घरापर्यंतची गटार लाईन आणि पालेश्वरी मंदिर ते दीपक उलवेकर यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करून ही कामे जनतेसाठी खुली करण्यात आली आहेत.











लोकार्पणासोबतच नवीन कामांचे भूमिपूजनही या वेळी पार पडले. यात मकरध्वज सभा मंडपासाठी ३० लाख रुपये, फणसवाडी येथील साकव कामासाठी २० लाख रुपये आणि पालेबुद्रुक तलावावर गणेश घाट बांधण्यासाठी दोन लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय गोविंद म्हात्रे ते वसंत तांडेल यांच्या घरापर्यंतचे रस्ते, किशोर भोपी ते विकास पाटील यांच्या घरापर्यंतची कामे आणि अंगणवाडी पर्यंतच्या बंदिस्त गटारांच्या कामांना आता प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. या कामांचा शुभारंभ भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला.

भाजपच्या या विकास पर्वामुळे पाले बुद्रुकचा सर्वांगीण विकास होत असल्याची भावना नागरिकांनी यावेळी व्यक्त केली. या विकास कामांच्या शुभारंभावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, संजय पाटील, भाजपचे पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, भाजपनेते एकनाथ देशेकर, माजी सरपंच कृष्णाशेठ पाटील, प्रकाश खैरे, अंकुश पाटील, सरपंच निखिल तांडेल, उपसरपंच पप्पू पारधी, लक्ष्मण उलवेकर, कांचन वासकर, निराशेटतांडेल, दशरथ वासकर, बाळाराम पवार, केशव उलवेकर, मधुकर उलवेकर, त्रिंबक तांडेल, केतन तांडेल, विष्णु उलवेकर, नाना तांडेल, प्राशन पवार, व्यास पवार, दिलीप वासकर, शिवराम उलवेकर, अर्जुन मोरे, प्रमोद गोपी, विश्वास पवार, सतीश भोपी, किशोर गोपी, कुंडल वासकर, पांडुराम फडके, प्रदीप म्हात्रे, रघुनाथ तांडेल, अविनाश उलवेकर, दीपक उलवेकर, जनार्दन उलवेकर, रवींद्र तांडेल, शिवराम म्हात्रे, संदीप म्हात्रे, प्रसन्न म्हात्रे, सविता उलवेकर, कुष्णा उलवेकर, करुणा उलवेकर, भरती उलवेकर, छाया उलवेकर, निशा मोरे, योगिता उलवेकर, कृष्णाबाई मोरे, प्रणाली उलवेकर, प्रगती उलवेकर, भावना उलवेकर, कल्पना बारसे, तृप्ती पवार, कुंदा पवार, स्वाती उलवेकर, वैशाली भोपी, मनीषा भोपी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## फार्म हाऊस, रिसॉर्टच्या चालक, मालकांना पनवेल पोलिसांकडून सूचना

**पनवेल : वार्ताहर**

३१ डिसेंबर व नवीन वर्ष आगमन निमित्ताने पनवेल तालुका पोलीसांच्या मार्फत हद्दीतील फार्म हाऊस, रिसॉर्टच्या चालक व मालक यांना महत्त्वाच्या सूचना अनुषंगाने बैठक घेऊन देण्यात आल्या.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दीतील फार्म हाऊस रिसॉर्ट चालक मालक यांची ३१ डिसेंबर व नवीन वर्ष आगमन निमित्ताने कार्यक्रमाचे अनुषंगाने बैठक घेण्यात आली.





या वेळी त्यांनी सूचना करताना सांगितले की, सीसीटीव्ही कॅमेरे अद्यावत करणे, अमली पदार्थ वापर होणार नाही याची दक्षता घेणे, स्पीकर परवानगी घेणे व विहित वेळेत स्पीकर बंद करणे, फार्म हाऊस रिसॉर्ट येथे क्षमता असेल तेवढीच बुकिंग करणे, अग्निशमन किट/फायर वाटला ठेवणे, फार्म हाऊस रिसॉर्ट येथे काम करणारे कामगारांचे व्हेरिफिकेशन करून घेणे, सेक्युरिटी गार्ड नेमणे,स्विमिंग पूल असल्यास तेथे प्रशिक्षित व्यक्तींची नेमणूक करणे, वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही त्याकरिता पार्किंग व्यवस्था करणे आदी संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी सदर बैठकीस ३० फार्म हाऊस रिसॉर्ट चालक-मालक हजर होते.

## पनवेल वाहतूक शाखेमुळे अनर्थ टळला



**पनवेल : वार्ताहर**

जेएनपीटी रोडवरील मानघर ब्रिजच्या वर पिकअप आणि डंपरमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीचा खोळंबा झाला होता, मात्र पोलीस प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला असून वाहतूक पुन्हा एकदा पूर्ववत करण्यात आली आहे.

हा अपघात घडल्यानंतर पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पवार, पोलीस हवालदार यादव, पोलीस हवालदार पवार, पोलीस नाईक केशव निकम आणि एमएसएफच्या जवानांनी अत्यंत कौशल्याने परिस्थिती हाताळली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या मध्यभागी असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला होता, त्यामुळे क्रेन पाचारण करण्यात आली.

क्रेनच्या सहाय्याने ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करून पोलिसांनी रस्त्यावरील अडथळा दूर केला आणि विस्कळीत झालेली वाहतूक तात्काळ सुरळीत केली.

## वैमानिक प्रशिक्षणाच्या नावे फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

वैमानिक प्रशिक्षणाच्या नावाखाली तरुण प्रशिक्षणार्थी आणि त्यांच्या पालकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

एका संस्थेचे संचालक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैमानिक प्रशिक्षणाच्या नावाखाली चार प्रशिक्षणार्थी मुलींकडून तब्बल दोन कोटी ३९ लाख रुपये उकळल्याचा आरोप पालकांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. बोरीवली येथील ५८ वर्षांचे सेवानिवृत्त एअर इंडिया कर्मचारी हे पीडित प्रशिक्षणार्थी मुलीचे पालक आहेत. त्यांनी मुलीच्या प्रशिक्षणासाठी ५४ लाख रुपये (करांसह) या संस्थेत भरले होते. सप्टेंबर २०२४ पासून खारघर येथील कार्यालयातून प्रशिक्षणाचे कामकाज सुरु होते.

मुलींना दुबईमधील एका संस्थेत पाठवण्यात आले, मात्र पूर्ण शुल्क न भरल्याने प्रशिक्षण थांबविल्याने प्रशिक्षणार्थींना भारतात परतावे लागले. अद्याप या प्रकरणातील संशयीत आरोपींना अटक करण्यात आलेली नाही.





**पनवेल : चिंद्रणचे माजी उपसरपंच नरेश सोनावणे यांना वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते एकनाथ देशेकर, राजेंद्र पाटील, सरपंच एकनाथ पाटील, शिवाजी दुर्गे, रघुनाथ फराड, दिनेश पाडेकर, अनंता कडु, शांताराम कुंभारकर, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.**

## विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षेत 'सीकेटी'च्या नक्षत्रा गरुडची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विज्ञान भारती यांच्या वतीने तसेच एनसीईआरटी व नॅशनल कौन्सिल ऑफ सायन्स म्युझियम्स यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणारी राष्ट्रीय स्तरावरील विज्ञान प्रतिभा शोध परीक्षा विद्यार्थी विज्ञान मंथन (व्हीव्हीएम) परीक्षा २०२५ जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सीकेटी) विद्यालयात यशस्वीरित्या झाली.

या परीक्षेत संस्थेतील एकूण ३० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यामधून १५ विद्यार्थ्यांनी परीक्षेची पहिली फेरी यशस्वीरित्या उत्तीर्ण केली. त्यामध्ये ११ वी सायन्स वर्गात शिकत असलेली नक्षत्रा भगवान गरुड या विद्यार्थिनीने उत्कृष्ट कामगिरी करत दुसऱ्या फेरीत पात्रता मिळविली. त्यामुळे तिची राज्यस्तरीय शिबिरासाठी निवड झाली आहे.



या परीक्षेत नक्षत्राने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## वडाळे तलाव परिसरात सामूहिक ध्यान सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संयुक्त राष्ट्रांनी २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिन म्हणून घोषित केला आहे. या निमित्ताने, पनवेल येथील हिमालयीन समर्पण ध्यान योगाने सकाळी ६:३० वाजता नैसर्गिक वातावरणात आणि सकाळच्या सौम्य थंडीत वडाळे तलावाच्या मैदानावर एका मोठ्या सामूहिक ध्यान सत्राचे आयोजन केले होते.

योग भारती अभ्यासक आणि ध्यानप्रेमीदेखील यात सहभागी झाले. आज ध्यानाची आवश्यकता का आहे, त्याचे फायदे आणि जगभरातील ७२ देशांमध्ये ते मोफत शिकवले जाते याबद्दल माहिती दिल्यानंतर शेवटी उपस्थित नागरिकांनी ३० मिनिटांचा ध्यान अनुभव घेतला.



## 'सीकेटी'तील कौशल्य विकास केंद्रातर्फे संपर्क अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमधील भागूबाई चांगू ठाकूर कौशल्य विकास केंद्राच्या वतीने महाविद्यालयात शुक्रवार १९ व २० डिसेंबर २०२५ रोजी संपर्क अभियान (Outreach Programme) आयोजित करण्यात आले होते.

भागूबाई चांगू ठाकूर कौशल्य विकास केंद्राच्या अंतर्गत आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी व डिजिटल फॉरेन्सिक, इंटिरियर डिझाईन तसेच फॅशन व ॲपरेल डिझाईन असे कौशल्याधारित अभ्यासक्रम चालवले जातात. या अभ्यासक्रमाची माहिती अधिकाधिक युवकांपर्यंत पोहचावी या उद्देशाने आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग तसेच सायबर सिक्युरिटी व डिजिटल फॉरेन्सिक विभाग समन्वयक समीर कांबळे, इंटिरियर डिझाईन पदवी अभ्यासक्रम समन्वयक आर्किटेक्ट स्वेच्छा गोसावी, इंटिरियर डिझाईन डिप्लोमा अभ्यासक्रम समन्वयक प्रज्योती देसाई आणि फॅशन व ॲपरेल डिझाईन विभाग समन्वयक दीपश्री राठोड यांच्या प्रयत्नांतून हे संपर्क अभियान राबवण्यात आले. या उपक्रमास विज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. ज्योत्स्ना ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.



या कार्यक्रमाचे उद्घाटनावेळी प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांच्या सोबत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. बी. डी. आघाव आणि विज्ञान विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्योत्स्ना ठाकूर हेदेखील उपस्थित होते. कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या उपक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या पुढाकाराने आणि संस्थेचे अध्यक्ष आदरणीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मान्यतेने करण्यात आली.

या अभ्यासक्रमांच्या वतीने आयोजित विभागीय प्रदर्शनास उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख यांनी भेट देत विद्यार्थ्यांना आपल्या अनुभवातून बहुमोल मार्गदर्शन केले.या संपर्क अभियानामध्ये चार विविध शैक्षणिक संस्थांमधील सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ रोजी छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत कनिष्ठ महाविद्यालय येथून ९० विद्यार्थी जयराम सोनटक्के, एम. के. घरत व तांडेल मॅडम या तीन प्राध्यापकांसह उपस्थित होते. त्याच दिवशी सी.के.टी. कनिष्ठ महाविद्यालय, पनवेल येथून १५० विद्यार्थ्यांनी ज्योती वाघ, हर्षदा लोखंडे, माधवी कोळी, विजय कुमावत, गणेश पाटील व विवेक पाटील या सहा प्राध्यापकांसह या प्रदर्शनास भेट दिली.

शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कामोठे येथून १३२ विद्यार्थी अमृता गुरव, सरिता सोमाणी आणि स्मिता शर्मा या तीन प्राध्यापकांसह उपस्थित होते. त्याच दिवशी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथून ७५ विद्यार्थी दुर्गादेवी मौर्या, अश्विनी कासरेकर, स्नेहल अवळे या तीन प्राध्यापकांसह संपर्क अभियानास उपस्थित होते.

सूत्रसंचालन मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक नम्रता कडू आणि इंग्रजी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापक कादंबरी पाटील यांनी प्रभावीपणे केले. या संपर्क अभियानादरम्यान विविध विभागांद्वारे अभ्यासक्रमांची माहिती, अभ्यासक्रमाची रचना तसेच करिअरच्या संधी याविषयी सविस्तर सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना संबंधित विभागांमध्ये नेऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिके व विभागीय प्रदर्शने दाखविण्यात आली.

## संपादकीय

# उपाययोजनेचे आव्हान

कुत्रा चावल्याने दिव्यातील एका चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. तर भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्वाळाही दिला आहे. अलीकडे मुले व मोठ्यांवरही भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटना अधुनमधुन कानावर येतच असतात. सोबतच सातत्याने समोर येतो तो श्वानप्रेमी आणि त्यांना विरोध करणारे सर्वसामान्य यांच्यामधील संघर्ष. भटक्या कुत्र्यांची समस्या देशभरातच गंभीर झाली असून सगळीकडेच कुत्र्यांची संख्या मोठी असल्याने त्यांची नसबंदी व निवारा केंद्रांमध्ये रवानगी या उपाययोजनाही आव्हानात्मकच आहेत.

**पिसाळलेला कुत्रा चावल्याने दिव्यातील निशा शिंदे नावाच्या एका पाच वर्षीय चिमुकलीचा अलीकडेच मृत्यू झाला. घराबाहेर खेळत असताना महिनाभरापूर्वी एका कुत्र्याने तिच्यावर हल्ला केला होता. चौथे इंजेक्शन दिल्यानंतर अचानक तिची प्रकृती बिघडली आणि तिच्यात रेबिजची लक्षणे दिसू लागली. त्यानंतर रुग्णालयात उपचार घेताना तिचा मृत्यू झाला. नाशिकमध्ये एका गावात पिसाळलेल्या कुत्र्याने पाच लहान मुलांना चावा घेतल्याची बातमीही बुधवारी समोर आली. याचसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्वाळाही दिला आहे. भटक्या कुत्र्यांना अन्न देण्यासाठी नियमांप्रमाणे ज्या जागा निश्चित झालेल्या आहेत, त्या ठिकाणांव्यतिरिक्त अन्यत्र अन्न देण्यापासून एखाद्याला रोखणे हे बेकायदा कृत्य म्हणता येणार नाही असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पुण्यातील एका सोसायटीत एका श्वानप्रेमी तरुणीला एका व्यक्तीने सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळ भटक्या कुत्र्यांना अन्न देण्यापासून अडवल्यानंतर त्या तरुणीने संबंधित व्यक्तीविरोधात फौजदारी गुन्हा दाखल केला. हा गुन्हा उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला आहे. सोसायटीचे प्रवेशद्वार हे कुत्र्यांना अन्न देण्यासाठीचे अधिकृत ठिकाण नाही असे सोसायटीच्या सदस्यांचे म्हणणे होते. वादानंतर तरुणीच्या तक्रारीवरून पोलिसांनी त्या व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदवला. हा गुन्हा रद्द होण्यासाठी संबंधित व्यक्तीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर न्यायालयाने सुस्पष्ट निर्वाळा दिला आहे. पदपथ, सोसायटीचे प्रवेश व निर्गमन मार्ग, शाळेच्या बसचे थांबे अशा ठिकाणी कुत्र्यांना अन्न देण्यापासून थांबवणे हे गुन्हेगारी अडथळा मानता येणार नाही असे कोर्टाने म्हटले आहे. असे वाद सध्या सगळीकडे होताना दिसतात. एका पाहणीनुसार वर्षभरात देशात कुत्र्यांच्या हल्ल्यांची २१ लाख प्रकरणे नोंदली गेली आहेत. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे लसीकरण आणि नसबंदी करून त्यांना निवारा केंद्रात ठेवण्याचे आदेश दिले आहेत. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संकुले, बस व रेल्वे स्थानके यांसारख्या सार्वजनिक ठिकाणांहून भटक्या कुत्र्यांना तातडीने हटवावे असेही न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्वत:हून या समस्येची दखल घेतली आहे. ज्या ठिकाणाहून भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण केले आहे त्यांना त्या भागात पुन्हा सोडू नये असेही न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले होते. न्यायालयाने प्रशासनाबरोबरच सार्वजनिक संस्थांवरही यासंदर्भातील जबाबदारी सोपवली आहे. अलीकडेच राज्याच्या विधानसभेतही यावर चर्चा झाली. मुंबईत ९० हजारांहून अधिक भटके कुत्रे असल्याचे व निवाराकेंद्रे मात्र फक्त आठच असल्याचे मुंबई महापालिकेनेही स्पष्ट केले आहे. कुत्र्यांच्या वाढीचा दर खूपच जलद असल्याने त्यांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी प्रभावी नसबंदी आवश्यक असते. राज्यातील अन्य शहरांमध्येही परिस्थिती अशीच आहे. निवारा केंद्रांची संख्या वाढवण्याची गरज असून याकामी स्वयंसेवी संस्थांनी सरकारी प्रयत्नांना जोड देण्याची मोठी गरज आहे.**

# अटल बिहारी वाजपेयी यांचे साहित्यिक योगदान

भारतीय सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांची ओळख एका क्षेत्रापुरती मर्यादित राहत नाही. त्यांच्या विचारांची, भावनांची आणि सर्जनशीलतेची व्याप्ती अनेक अंगांनी विस्तारलेली असते. भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी हे असेच एक अद्वितीय, बहुआयामी आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. जरी त्यांची ओळख प्रामुख्याने एक थोर राजकारणी, कुशल प्रशासक आणि राष्ट्रनेते म्हणून झाली असली, तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अंतरंगात दडलेला संवेदनशील कवी आणि प्रगल्भ साहित्यिक तितकाच महत्त्वाचा होता. त्यांच्या साहित्यिक योगदानाने हिंदी साहित्याला एक वेगळी दिशा, खोली आणि व्यापकता प्राप्त करून दिली.



अटल बिहारी वाजपेयी यांचे साहित्य म्हणजे केवळ कविता किंवा लेखन नव्हे, तर ते त्यांच्या जीवनप्रवासाचे, वैचारिक संघर्षांचे, राष्ट्रप्रेमाचे आणि मानवी संवेदनांचे सर्जनशील प्रतिबिंब आहे. शब्दांच्या माध्यमातून त्यांनी जे विचार मांडले, ते केवळ एका विशिष्ट काळापुरते मर्यादित न राहता कालातीत ठरणारे आहेत. म्हणूनच आजही त्यांचे साहित्य वाचताना ते समकालीन वाटते आणि अंतर्मुख करते.

अटल बिहारी वाजपेयी यांची साहित्यिक ओळख प्रामुख्याने कवी म्हणूनच होते. त्यांची कविता सहज, साधी, ओघवती आणि भावस्पर्शी आहे. त्यांनी अलंकारिक अवडंबर, क्लिष्ट शब्दरचना किंवा कृत्रिम भावुकता टाळून थेट हृदयाला भिडणारी काव्यशैली स्वीकारली. त्यांच्या कवितांमध्ये देशप्रेम, मानवी मूल्ये, वेदना, आशा, निराशा, जीवनसंघर्ष आणि शांततेची आकांक्षा यांचे प्रभावी दर्शन घडते.अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रमुख काव्यसंग्रहांमध्ये 'मेरी इक्यावन कविताएँ' आणि 'कैदी कविराज की कुंडलियाँ' यांचा समावेश आहे, तसेच 'सामवेदना' आणि 'नई दिशा' सारख्या रचना जगजित सिंग यांच्यासोबतच्या अल्बममध्येही आहेत, ज्यात 'गीत नया गाता हूँ', 'मौत से ठन गई', 'आओ फिर से दिया जलाएँ' यांसारख्या प्रसिद्ध कविता आहेत. Twenty-One Poems: त्यांच्या कवितांचा इंग्रजी अनुवाद असलेला संग्रह. 'पंद्रह अगस्त की पुकार' 'कदम मिला कर चलना होगा' 'हरी हरी दूब पर', 'दूर कहीं कोई रोता है' या त्यांच्या काही प्रसिद्ध कविता आहेत

तुरुंगवासाच्या काळात रचलेल्या कवितांमधून त्यांची मानसिक दृढता, आत्मसंवादाची क्षमता आणि वैचारिक प्रगल्भता प्रकर्षाने जाणवते. कठीण परिस्थितीतही शब्दांवरचा त्यांचा विश्वास डगमगला नाही. त्यांच्या कवितांमध्ये राष्ट्र ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून एक जिवंत, सजीव भावना आहे. भारतमातेविषयीची त्यांची श्रद्धा, आपुलकी आणि कृतज्ञता त्यांच्या काव्यातून सातत्याने व्यक्त होते. देशासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचे स्मरण, सीमांवरील सैनिकांचे शौर्य आणि सामान्य जनतेच्या दुःखाशी एकरूप होणारी भावना त्यांच्या कवितांत ठळकपणे आढळते.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितांचे भावविश्व अत्यंत व्यापक, समृद्ध आणि बहुरंगी आहे. प्रेम, मैत्री, करुणा, वेदना, आशा, नैराश्य, आत्मचिंतन अशा मानवी भावनांचा त्यांनी अत्यंत सुसंस्कृत आणि प्रामाणिक आविष्कार केला आहे. त्यांच्या कवितांमध्ये आक्रस्ताळेपणा, कटुता किंवा द्वेष आढळत नाही; उलट आत्मपरीक्षणाची आणि सहवेदनाची खोल जाणीव दिसून येते.युद्ध आणि शांतता हा त्यांच्या कवितांचा एक महत्त्वाचा आणि सातत्याने आढळणारा विषय आहे. युद्धाच्या विध्वंसक परिणामांविषयी ते अत्यंत संवेदनशीलतेने लिहितात, तर शांततेचा संदेश ते ठाम, पण संयत शब्दांत मांडतात. मानवी जीवनाचे मोल, माणुसकीची गरज आणि संवादाचे महत्त्व यावर त्यांचा विशेष भर दिसून येतो.त्यांच्या काही कवितांमध्ये राजकीय अनुभवांचे सूक्ष्म, सूचक आणि अर्थपूर्ण प्रतिबिंब आढळते. मात्र त्या कविता प्रचारकी, आक्रमक किंवा पक्षीय वाटत नाहीत. त्या विचारप्रवर्तक ठरतात आणि वाचकाला अंतर्मुख करतात. सत्तेचे क्षणभंगुर स्वरूप, लोकशाहीतील जबाबदारी, नैतिकतेचा प्रश्न आणि नेतृत्वाची जाणीव त्यांनी काव्यात्मक पातळीवर समर्थपणे मांडली आहे.

अटल बिहारी वाजपेयी यांची काव्यभाषा साधी, प्रवाही, सुस्पष्ट आणि प्रभावी आहे. संस्कृतनिष्ठ शब्दसंपदा असूनही ती क्लिष्ट, जड किंवा दुरावणारी वाटत नाही. त्यांच्या कवितांमध्ये ओघवती लय, स्पष्ट प्रतिमा, सूक्ष्म प्रतीकात्मकता आणि भावनांची सहज, नैसर्गिक अभिव्यक्ती दिसून येते.त्यांची शैली चिंतनशील आहे. प्रत्येक कविता वाचकाला विचार करायला भाग पाडते, अंतर्मुख करते आणि आत्मसंवाद घडवून आणते. त्यामुळे त्यांची कविता केवळ वाचली जात नाही, तर अनुभवली जाते. जीवनातील क्षणभंगुरता, संघर्ष आणि आशावाद यांचा समतोल त्यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

हिंदी भाषेच्या संवर्धनासाठी आणि प्रतिष्ठेसाठी त्यांनी मोठे योगदान दिले. त्यांच्या साहित्यामुळे हिंदी भाषा केवळ राजकारणाची किंवा व्यवहाराची भाषा न राहता संवेदनांची, सर्जनशीलतेची आणि चिंतनाची भाषा ठरली. अटल बिहारी वाजपेयी यांची भाषणेही साहित्यिक मूल्यांनी परिपूर्ण होती. त्यांच्या भाषणांमध्ये काव्यात्मकता, सूक्ष्म विनोद, तात्त्विक चिंतन आणि वैचारिक स्पष्टता यांचा सुरेख संगम दिसून येतो. संसदेतील त्यांची भाषणे ही केवळ राजकीय वक्तव्ये नसून विचारशील, मूल्याधिष्ठित आणि साहित्यिक अभिव्यक्ती होती.उपमा, रूपके, श्लोक, काव्यपंक्ती आणि ऐतिहासिक संदर्भांचा त्यांनी अत्यंत प्रभावी आणि सुसंस्कृत वापर केला. त्यामुळे त्यांचे भाषण ऐकणाऱ्यांवर दीर्घकाळ परिणाम करत असे. वैचारिक मतभेद असूनही विरोधकही त्यांच्या भाषणशैलीचे आणि भाषेच्या सौंदर्याचे मनापासून कौतुक करत.

अटल बिहारी वाजपेयी यांचे साहित्य त्यांच्या जीवनाशी अतूटपणे जोडलेले आहे. संघर्ष, अपयश, टीका, एकाकीपणा, तुरुंगवास आणि राजकीय चढउतार यांचा अनुभव त्यांनी शब्दांतून प्रामाणिकपणे व्यक्त केला. मात्र त्यांच्या कवितांमध्ये कटुता, सूडभावना किंवा निराशेचे अतिरेकी स्वर दिसून येत नाहीत; उलट स्वीकारभावना, संयम आणि आशावाद ठळकपणे जाणवतो.त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू माणूस आहे. माणसातील चांगुलपणा, सहवेदना, नैतिकता आणि जबाबदारी यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांच्या कविता आजही वाचकांच्या मनाला भिडतात आणि अंतर्मुख करतात.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या साहित्यिक योगदानाचा आधुनिक हिंदी साहित्यावर खोलवर आणि दीर्घकालीन परिणाम झाला आहे. राजकारण आणि साहित्य यांचा समन्वय साधणारे ते एक दुर्मिळ, प्रेरणादायी आणि आदर्श उदाहरण ठरले. त्यांच्या काव्यामुळे राजकारणातील माणूसही संवेदनशील, विचारशील आणि साहित्यिक असू शकतो, हे ठळकपणे सिद्ध झाले.

आजच्या पिढीतील अनेक कवी, लेखक आणि विचारवंतांवर त्यांच्या शैलीचा प्रभाव दिसून येतो. साधेपणा, भावनिक प्रामाणिकपणा, राष्ट्रभावना आणि मानवी मूल्यांचा समतोल साधण्याची प्रेरणा त्यांच्या साहित्यातून मिळते.

अटल बिहारी वाजपेयी यांचे साहित्यिक योगदान हे भारतीय साहित्यविश्वासाठी एक अमूल्य, प्रेरणादायी आणि कालातीत ठेवा आहे. त्यांनी शब्दांना केवळ सौंदर्य दिले नाही, तर त्यांना विचारांची दिशा, भावनांची खोली आणि मूल्यांची अधिष्ठान दिले. कवी म्हणून त्यांनी मानवी वेदना, आशा आणि संघर्ष व्यक्त केले, तर साहित्यिक म्हणून समाजाला अंतर्मुख केले. त्यांचे साहित्य काळाच्या पलीकडे जाणारे आहे. राजकारणाच्या गदारोळातही साहित्याची शांत, सुसंस्कृत आणि संवेदनशील वाट दाखवणारा अटल बिहारी वाजपेयी यांचा साहित्यिक वारसा सदैव प्रेरणादायी राहील. शब्दांच्या माध्यमातून त्यांनी जे राष्ट्रभावनेचे आणि माणुसकीचे दीप प्रज्वलित केले, तो दीप भारतीय साहित्याच्या आकाशात दीर्घकाळ उजळत राहील.

**– डॉ.सीमा निवृत्ती कांबळे (सादळेकर)**
प्राचार्य,श्री.बापूसाहेब डी.डी.विसपुते
बी.एड,एम.एड कॉलेज,नवीन पनवेल



## बदलते तंत्रज्ञान

# नेकबँड विरुद्ध इयरबड्स, कोणते फायद्याचे? जाणून घ्या

आज आम्ही तुम्हाला इयरबड्सविषयी महत्त्वाची माहिती देणार आहोत. तुम्ही नेकबँड किंवा इयरबड्स वापरत




असाल तर ही माहिती तुम्ही नक्की वाचा. वायरलेस नेकबँड आणि इयरबड्स आता ट्रेंड बनले आहेत, परंतु बऱ्याचदा युजर्स त्यापैकी एक निवडू शकत नाहीत. आपल्यासाठी कोणते नेकबँड किंवा इयरबड्स चांगले आहेत, याची तुलना करूया आणि आपण समजून घेऊया.

आजकाल सर्वच वयोगटातील मंडळी इयरबड्स आणि नेकबँडचा वापर करताना दिसतात. पण तुम्हाला कधी प्रश्न पडला आहे का की, कोणते इयरबड्स योग्य? नेकबँड किंवा इयरबड्स यापैकी कोणते वापरावे? आजकाल वायरलेस ऑडिओचा ट्रेंड खूप वाढला आहे आणि अनेकदा येणारे दोन मुख्य पर्याय म्हणजे नेकबँड आणि इयरबड. दोन्ही पोर्टेबल आणि आरामदायक आहेत. परंतु त्यांचे फीचर्स, फायदे आणि तोटे यात काही आवश्यक फरक आहेत. या दोन्ही प्रकारच्या ॲक्सेसरीजची तुलना करू जेणेकरून आपल्यासाठी कोणते योग्य आहे, हे आपण ठरवू शकता.

नेकबँडमध्ये दोन इयरपीस असतात जे गळ्याच्या मागील बाजूस घातलेल्या लवचिक बँडद्वारे जोडलेले असतात. या बँडमध्ये बॅटरी, ब्लूटूथ, चिप आणि कंट्रोल बटन देण्यात आलं आहे. त्याचवेळी इयरबड्स लहान, वायरलेस इयरपीस आहेत जे थेट कानात ठेवले जातात. ते पूर्णपणे स्वतंत्र आहेत आणि कोणत्याही स्ट्रिंग किंवा बँडशिवाय कार्य करतात. ते चार्जिंग केससह येतात जे त्यांना साठवण्याचे आणि चार्ज करण्याचे काम करतात.

इयरबड्स दोन वेगवेगळ्या भागांमध्ये केसमधून काढून टाकले जातात आणि ब्लूटूथसह वायरलेस कनेक्टिव्हिटी प्रदान करतात. याशिवाय नेकबँडमध्ये ब्लूटूथसह कनेक्टिव्हिटी उपलब्ध आहे. परंतु दोन्ही इयरटिप्स वायरद्वारे आपल्याशी जोडलेल्या आहेत. इयरबड्स कानाच्या आत ठेवले जातात आणि मानेवर घातल्यानंतर नेकबँडचा वापर करता येतो.

हार्डवेअर बटणांच्या साहाय्याने नेकबँडवर कंट्रोल सहज मिळवता येतं. काही इयरबड्समध्ये टच कंट्रोलच्या पर्याय असला तरी नेकबँडवर चांगले हार्डवेअर कंट्रोल देण्यात आले आहेत. बाकी फीचर्सबद्दल बोलायचे झाले तर नेकबँड आणि इयरबड्स दोन्ही सारखेच काम करतात आणि त्यांना समान फीचर्स मिळतात.

# नाताळ सणाचे महत्त्व आणि परंपरा

नाताळ किंवा ख्रिसमस हा एक ख्रिस्ती सण आहे. हा सण दर वर्षी २५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. ह्या दिवशी ख्रिस्ती बांधवांचे लाडके प्रभू येशू यांचा जन्म झाला होता. काही ठिकाणी हा सण ६, ७ किंव्हा १९ जानेवारीला एपिफानी म्हणून साजरा करतात. हा सण १२ दिवसांचा असून ख्रिसमस्टाईड पर्वाची सुरुवात होते. जगाभरात हा सण साजरा होतो. काही ठिकाणी मध्यरात्री हा सण साजरा केला जातो. तर काही ठिकाणी संध्याकाळी हा सण साजरा केला जातो.



## निमित्त

क्रिसमस किवा नाताळ हा सण प्रारंभीच्या ख्रिस्तसभेत मुळीच अस्तित्वात नव्हता. खरे पाहता पूर्वी येशूजन्माचा उत्सव मागी लोकांच्या आगमनापर्यंत ६ जानेवारी या दिवशी साजरा केला जाई. पौर्वात्य ख्रिस्तसभेमध्ये तिसऱ्या शतकात आणि रोमन ख्रिस्तसभेमध्ये इ. सन ३०० च्या जवळपास नाताळ साजरा करण्यात येऊ लागला. रोम शहरात ही तारीख २५ डिसेंबर अशी ठरविण्यात आली.

कॉन्स्टन्टाईन या रोमन सम्राटाने ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्याने ख्रिस्ती धर्माला प्रोत्साहन देण्यासाठी सूर्याची उपासना न करता सूर्याचा निर्माता आणि नीतिमत्तेचा सूर्य जो प्रभू येशू त्याची उपासना करणे सुरू केले. अशा प्रकारे २५ डिसेंबर हा दिवस रोमन कॅथोलिक ख्रिस्तसभेत येशू ख्रिस्ताचा जन्मदिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. त्यावरून या उत्सवाला नाताळ असें नाव पडले.

नाताळ हा शब्द नातूस म्हणजे जन्म या लॅटिन शब्दापासून बनला आहे. या दिवसाला इंग्रजी भाषेत क्रिसमस म्हणतात. ख्रिसमस म्हणजे ख्रिस्तमहायज्ञ (मिस्सा). ख्रिस्त महागुरुंना ख्रिस्तमसच्या दिवशी तीन मिस्सा अर्पण करण्याची परवानगी दिली गेली. ख्रिस्ताच्या जन्मघटकेचे स्मरणार्थ मध्यरात्रीचा मिस्सा बेथलहेम येथे अर्पण केला जातो ख्रिस्ताचा जन्म मध्यरात्री झाला अशी मान्यता आहे. दुसरा मिस्सा पहाटे व तिसरा मिस्सा दिवसात अर्पण केला जात असे.

नाताळ सणामध्ये भेटवस्तू देण्याची प्रथा अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः लहान मुले ह्या सणाची खूप आतुरतेने वाट बघतात. सांताक्लॉज येऊन मुलांना भेट वस्तू आणि खाऊ देतात अशी मुलांना समज असते. महाराष्ट्रातील ख्रिस्ती लोक दिवाळीप्रमाणे या दिवशी करंज्या व अन्य खाद्यपदार्थांचे एकमेकांस आदान–प्रदान करतात. लहान मुलांना सांताक्लॉजच्या वेषात येऊन भेटवस्तू देतात.

या दिवशी ख्रिश्चन अनुयायी एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छा पत्रे देऊन परस्पर अभिनंदन करतात. आपल्या घरात रोषणाई करतात. घराला सजवतात. 'ख्रिसमस वृक्ष सजावट' करतात. हे झाड ह्या सणाचा एक अविभाज्य घटक आहे. ख्रिसमस ट्री हे स्वर्गातल्या ईडन बागेतील झाड व क्रूसाचे झाड यांचे प्रतीक आहे.

या सणावर चॉकलेट केक बनवले जाते. कॅथोलिक ख्रिस्तसभेमध्ये ख्रिस्तजन्माची स्मृती म्हणून गोशाळा किंव्हा गायीचा गोठा तयार करण्याची परंपरा आहे. हा सण लहान थोर सर्वे अति उत्साहाने आनंदाने साजरा करतात. हा सण सर्वांना एकत्र आणण्याचा सण आहे. **(साभार : वेबदुनिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# हृदयविकारासाठी थंडीत हे ड्रायफ्रुट्स लाभदायक

हिवाळ्यात हार्ट अटॅकचे प्रमाण जादा असते. त्यामुळे हिवाळ्यातील आपला आहार वेगळा असायला हवा. आपल्याकडील ड्रायफ्रुट्समध्ये अनेक पोषकतत्व असल्याने हिवाळ्यात त्यांचा वापर करायला हवा. अक्रोड, बदाम, काजू आणि पिस्ता यांचे जर योग्य प्रमाणात आहारात वापर केला तर हृदयाचे आरोग्य सुधारायला मदत होते. मात्र अधिक प्रमाणात ड्रायफ्रुट्स धोकादायक ठरू शकतात. तज्ज्ञांच्या मते बदाम, अक्रोड, काजू, मणुके, पिस्ता असे मिळून रोज ३० ग्रॅमपेक्षा जास्त खाऊ नये. चला पाहूयात याचा हृदयावर कसा परिणाम होतो.



मणुका – मणुकात मॅग्निशियम, पोटॅशियम, आयर्न, झिंक, सारखे महत्वपूर्ण मिनरल्स असतात. हृदयाचे कार्य चांगले राखण्यास त्यामुळे मदत मिळते. यात फायबर आणि एंटीऑक्सीडेंट्स देखील असतात. त्यामुळे कोलेस्ट्रोल कमी होते. थंडीत मणुके खाल्ल्याने ब्लड प्रेशर आणि कोलेस्ट्रोल कंट्रोलमध्ये रहाते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

अक्रोड – अक्रोडमध्ये हृदयासाठी खूपच फायदेशीर घटक असतात. अक्रोडमध्ये मोनोअनसेचुरेटेड आणि पॉलीअनसेचुरेटेड फॅटी एसिड सारखे हेल्थी फॅट्स असतात. यामुळे रक्तातील कोलेस्ट्रोल कमी होते. यात फायबर आणि विटामिन्स ई देखील आढळते. त्यामुळे हृदयरोगापासून बचाव होतो.

बदाम – बदामात ओमेगा – ३ फॅटी एसिड असते. हे हृदयासाठी खूपच फायदेशीर आहे. ओमेगा– ३ फॅटी एसिड रक्तातील एकूण कोलेस्ट्रोल आणि ट्रायग्लिसराईडच्या प्रमाणास कमी करण्यास मदत करते. याशिवाय रक्त पातळ बनविते. तसेच हृदयाची स्पंदने नियंत्रित करण्यात मदत करते.

पिस्ता – रस्त्यात भरपूर प्रमाणात एंटीऑक्सीडेंट्स आढळते. जे हृदयासाठी आवश्यक असते. पिस्त्यातील एंटीऑक्सीडेंट्स फ्री रेडीकल्सला नष्ट करायला मदत करते. हे ऑक्सीडेटिव्ह तणावाला कारण बनतात. हे धमन्यांचा संकुचित होण्यास रोकते. तसेच कोलेस्ट्रोल जमण्यास रोकण्याची ताकद त्यात असते. पिस्ता खाल्ल्याने हार्ट अटॅक आणि स्ट्रोक रोखण्यास मदत मिळते.

# श्रीवर्धन तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइडची वाहतूक; प्रशासनाची डोळेझाक

**श्रीवर्धन : बातमीदार**



श्रीवर्धन तालुक्यात क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइडची वाहतूक अत्यंत जोमात सुरू आहे. त्याचप्रमाणे बॉक्साइडचे उत्खनन परवानगी न घेता किंवा घेतलेल्या परवानगी पेक्षा जास्त पटीने करून अनेकांनी पैसे कमावण्याचा धंदा जोरात सुरू ठेवलेला आहे. मात्र या सर्व प्रकाराकडे तालुका प्रशासनाने पूर्णपणे काणाडोळा केला आहे. क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईट घेऊन जाणारे दहा चाकी डंपर बॉक्साईड खाणी पासून वडघर पांगलोली, त्याचप्रमाणे चांदोरे या ठिकाणी बॉक्साइडची वाहतूक करत असतात. याबाबत पेणचे प्रादेशिक परिवहन आधिकारी महादेव सूर्यवंशी यांच्याजवळ संपर्क साधला असता त्यांनी सदर क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतुकी वरती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.

मात्र प्रत्यक्षात अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. श्रीवर्धन तालुक्यात विविध राजकीय पक्षांशी संबंधित असलेले स्थानिक नेते आपल्या सोयीनुसार बॉक्साइडचा धंदा जोरात चालवण्यासाठी पक्षांतर करून देखील मोकळे झाले आहेत. श्रीवर्धन तालुक्यात दिवसेंदिवस पर्यटन वाढत आहे. या ठिकाणी येणारा पर्यटक हा या ठिकाणच्या निसर्ग सौंदर्याची भुरळ पडल्यामुळे येत असतो. परंतु दिवसेंदिवस बॉक्साइड उत्खनन करून श्रीवर्धन परिसरातील वनसंपत्ती व डोंगर पूर्णपणे उघडे होत चालले आहेत. भविष्यात अशाच प्रकारे बॉक्साइड उत्खनन सुरू राहिले तर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भूस्खलना सारखे प्रकार झाल्याशिवाय राहणार नाहीत.

बॉक्साइडचे उत्खनन करणाऱ्या कंपन्यांना अटी व शर्ती घालून दिलेल्या असतात. यामध्ये बॉक्साइड उत्खनन केलेल्या ठिकाणी पुन्हा मातीचा भराव करून त्यावरती झाडे लागवड करण्याची अट आहे. परंतु अशा प्रकारे कोणत्याही उत्खनन करणाऱ्या कंपनीकडून झाडे लावण्यात येत नाहीत. बॉक्साईड उत्खनन करताना किती टनाची रॉयल्टी भरली आहे व किती टन बॉक्साइड काढले जात आहे. यावर कोणत्याही शासकीय यंत्रणेचे लक्ष नाही. या ठिकाणी आंधळ दळतंय कुत्र पीठ खातय या म्हणीच्या उक्ती प्रमाणे कारभार सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन तालुक्यात होत असलेल्या क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साइड वाहतूक व फॉरकॉन कंपनीच्या दगड वाहतुकीमुळे तालुक्यातील रस्त्यांची वाट लागत आहे.

अनेक नवीन बनवलेले रस्ते बऱ्याच ठिकाणी खचत आहेत. श्रीवर्धन शहरातील नगरपालिका हद्दीतील रस्ते तर पूर्णपणे ढासळले आहेत. मात्र पेण येथील प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी या सर्व प्रकाराकडे डोळेझाक करत आहेत. जर प्रादेशिक परिवहन विभागाने या क्षमतेपेक्षा जास्त अवजड वाहतकीवर कारवाई केली नाही. तर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेणार असल्याचे काही नागरिकांनी बोलून दाखविले आहे.

अनेक वेळा बॉक्साइडची वाहतूक करणाऱ्या डंपर्समुळे अपघात देखील झालेले आहेत. परंतु प्रशासन या कोणत्याही प्रकाराकडे लक्ष देत नाहीत. रे अनेक लांबच लांब अवजड वाहतूक करणारे ट्रक या ठिकाणी रोडवरती फिरत असल्यामुळे अनेक वेळा वाहतूक कोंडी होते.

## धोकादायक प्रकल्प स्थलांतरीत करण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**


रसायनी कोन रस्त्यावरील टेक केअर ग्लोबल सर्विसेस या कंपनीतून पसरणाऱ्या तीव्र दुर्गंधीमुळे या परिसरातील नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून हा प्रकल्प रहिवासी क्षेत्रापासून स्तथांतरीत करावा, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

या ठिकाणी रसायने व इतर उत्पादनांच्या वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या टँकची तपासणी, व्यावसायिक देखभाल, दुरुस्ती आणि चाचणी एका विशिष्ट प्रकारे तज्ञांच्या निरीक्षणाखाली केली जात असल्याचे समजते. दररोज शेकडो-हजारो टँकची तपासणी केली जात असून त्या प्रक्रियेदरम्यान वापरल्या जाणाऱ्या विविध रासायनिक पद्धतीमुळे परिसरात अस्वस्थ करणारी तीव्र दुर्गंधी मोठ्या प्रमाणात पसरत असल्याचे नागरिकांसह प्रवाश्यांचे म्हणणे आहे. या दुर्गंधीमुळे वयस्क, जेष्ठ नागरिक, लहान मुले तसेच श्वसनाचे त्रास असलेल्या व्यक्तींना श्वास घेण्यास अडचण, डोळ्यांत जळजळ आणि अस्वस्थता जाणवत असल्याचे समजते. त्यामुळे परिसरातील वातावरणात बदल व हवा दूषित झाल्याती तक्रार समोर येत आहे

केमिकल क्षेत्रातील तज्ज्ञांच्या माहितीनुसर, ब्रोमिनसह विविध व्होलाटाईल ऑगनिक कंपाऊंड्स सारख्या रसायनांचा वापर प्रक्रिये दरम्यान होत झाल्यास अशा प्रकारची दुर्गंधीची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रवासी किंवा स्थानिक नागरीकांच्या मते मानवी आरोग्यास हानिकारक ठरू शकणारे असे विषारी वायू वातावरणात पसरत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

## माऊंट कार्मेल चर्च मध्ये नाताळ सणाची तयारी

**मुरुड : प्रतिनिधी**



प्रभू येशूच्या जन्म दीन निमित्ताने नाताळ हा सण साजरा केला जातो.मुरुड तालुक्यातील कोर्लई गावात सुमारे दोन हजार लोकवस्ती ख्रिश्चन समाजाची आहे. येथे डिसेंबर महिन्यात ख्रिसमस सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुलांचे विविध संस्कृतिक कार्यक्रमाबरोबर चर्च मध्ये मिसा व अन्य विधी उत्सहात साजरा केला जातो. दिनाक २४ डिसेंबर रोजी मध्यरात्री ख्रिस्ती समाज चर्च मध्ये एकत्र येऊन पार्थनेद्वारे बाळ येशूची जन्मोत्सव ग्लोरिया या गाण्याने क्रिसमस या सणाची सुरुवात केली जाते. चर्च चे फादर या वेळी विश्वशांतीसाठी पार्थना करून सर्वांना क्रिसमस सणाच्या पार्थनमय शुभेच्छा दिल्या जातात. सर्व ख्रिस्ती समाजासाठी येशू कडे प्रार्थना केली जाते. त्यानंतर चर्च च्या आवारात सर्व लोक एकमेकांना क्रिसमसच्या शुभेच्छा देऊन आनंद साजरा करीत असतात.

मध्यरात्री चर्चमध्ये प्रार्थनेचा आयोजन केलेला आहे. नाताळ गीतांना रात्रीच्या मिस्साबलिदानानी सुरुवात होते व संपूर्ण जगभरासाठी शांती व बंधुप्रेतीसाठी प्रार्थनेचा आयोजन केले जाणार आहे.

२५ डिसेंबर रोजी सकाळी सुद्धा मिस्साबलिदानाच आयोजन असेल दुपारी क्षणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी संपूर्ण धर्मग्रामातील लोकांसाठी खेळायचं आयोजन केलेलं आहे. २६ व २७ डिसेंबर २०२५ रोजी रायगड डिनरीचा युवा महोत्सव साजरा केला जाणार आहे. २८ डिसेंबर रोजी प्रभू येशूच्या जन्माचे देखावे स्पर्धा साजरी होणार आहे.

२९ डिसेंबर रोजी तारखा स्पर्धेचा आयोजन करण्यात आले आहे. ३० डिसेंबर रोजी क्रिसमस धमाका आयोजन आहे. त्यामध्ये गायन स्पर्धा, लहान मुलांसाठी नृत्य स्पर्धा. मोठ्या गटासाठी नृत्य. स्पर्धा असतील. लहान मुलांसाठी नृत्यस्पर्धा विषय प्रभू येशूच्या जन्माची कहाणी ही गीते तर मोठ्या गटासाठी विषय ईस्ट इंडियन संस्कृती हे सादरीकरण होईल.

या दिवसाच्या समारोप गाव जेवणाने होणार आहे. ३१ डिसेंबर २०२५ रात्री गतवर्षाबद्दल देवाचे आभार मानण्यासाठी प्रार्थनेचा आयोजन करण्यात आले आहे.

असा आठवड्या भराचा कार्यक्रम कोर्लई येथील ख्रिस्ती समाज साजरा करणार आहे. नाताळ सण निमित्ताने माऊंट कर्नल चर्च व माऊंट कार्मेल हायस्कूलची विद्युत रोषणाई व रंग रंगोटी करण्यात आली आहे. हा सण उत्साह पूर्वक साजरा होणार आहे. याबाबत माऊंट कार्मेल चर्च चे फादर बोनवेंचर नूनीस यांनी सांगितले की, नाताळच्या सण देवाची मानवावर असलेले प्रेमाची आठवण करून देतो.

## चरई खुर्द ग्रामपंचायत अंतर्गत विमा सुरक्षा योजना

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द हद्दीतील एकूण १३ बचत गटातील १०२ महिलांचे विमा सुरक्षा योजना फॉर्म भरण्यात आले

जिजाऊ, माऊली, काळभैरी क्षेत्रपाळ, आंबेमाता, लक्ष्मीनारायण, रमाई, सत्यसावित्री, माता पार्वती, भैरीदेवी, श्रीगणेश, प्रेरणा, सिद्धीविनायक स्वयंसहाय्यता महिला बचत गट यांनी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना वयोमर्यादा १८ ते ७०वर्ष विमा रक्कम २०/- रुपये वार्षिक असे ७६ महिला तसेच प्रधानमंत्री जिवन ज्योती योजना वयोमर्यादा १८ते ५० वर्ष विमा रक्कम ४३६/- रुपये वार्षिक २६ महिला अशा १०२ बचत गटातील महिलांचे विमा काढण्यात आला यांचे वयक्तिक फॉर्म भरून बँकेत जमा करण्यात आले



१३ बचत गटांचे १०२ फॉर्म सादर

आजचा निर्णय, उद्याची सुरक्षितता महिलांसाठी विमा सुरक्षा कवच.स्वतःची काळजी घेणारी महिला, खऱ्या अर्थाने सक्षम महिला. उक्ती प्रमाणे काम करणे गरजेचे आहे म्हणून ग्रामपंचायतने पुढाकार घेतला. रमाई स्वयंसहाय्यता महिला बचत गट खैराट बौद्धवाडी नवीन स्थापन तसेच आंबेमाता स्वयंसहाय्यता महिला बचत गट चरई खुर्द आदीवासीवाडी यांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आले

## 'पेण नगरपरिषद प्रभाग भाग २ मधील नागरी समस्यांबाबत अधिकारी वर्गाने लक्ष घालावे'

**पेण : प्रतिनिधी**



प्रभाग क्र. २ मधील मूलभूत सुविधा, सुरक्षा, वाहतूक, पार्किंग तसेच दूषित व अनियमित पाणीपुरवठ्याबाबत अधिकारी वर्गाने लक्ष देऊन सुधारणा कराव्यात या मागणीचे निवेदन नवनिर्वाचित भाजप नगरसेविका पल्लवी कालेकर यांनी नगरविकास अधिकारी सुहास कांबळे यांना दिले.

पेण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकी प्रचार दरम्यान प्रभागातील नागरिक, व्यापारी वर्ग, दुकानदार यांनी उमेदवारांकडे नगरपालिका प्रशासनाच्या कामावावात तीव्र असंतोष व नाराजी व्यक्त केली होती. या मागणीची दखल घेत प्रभाग २ मधील नगरसेविका पल्लवी कालेकर यांनी आज पेण नगरपरिषदेत निवेदन दिले.

यामध्ये अनियमित, अशुद्ध व कमी दाबाने पाणी पुरवठा, रस्ते, वाहतूक व पार्किंग संदर्भातील समस्या, महावीर मार्ग-वाजारपेठ रस्त्यांची अत्यंत खराव अवस्था, वाहतूक कोंडी, रात्रीची कमकुवत प्रकाश योजना, पोलीस- नगरपालिका समन्वयाचा अभाव, स्वच्छता व नालेसफाई गटारांचे तांत्रिक देखभाल न होणे, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या या समस्या नगरसेविका पल्लवी कालेकर यांनी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नागरिकांनी दाखवलेला विश्वास अबाधित ठेवणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे.

नुतन नगरसेविका म्हणून प्रशासनाची समन्वय व सहकार्याने प्रभागातील मुलभूत नागरी सुविथा सुधारण्याची माझी ठाम भूमिका आहे असे मत पल्लवी कालेकर यांनी व्यक्त केले.

## रोह्यात मोफत स्तन तपासणी शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

डॉ. जाधव नर्सिंग होम, रोहा आणि चजउ उरपलशी उरीश ठशीशरीलह उशर्पीश यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत स्तन (मॅमोग्राफी) तपासणी व निदान शिबिर मंगळवारी (दि.२३) यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात रोहा तालुक्यातील एकूण ३० महिलांची मोफत तपासणी करण्यात आली.

हे शिबिर सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत डॉ. जाधव नर्सिंग होम व आय.सी.यू. रोहा कोलाड रोड, दमखडी येथे पार पडले. शिबिरासाठी पूर्व नोंदणीची व्यवस्था ठेवण्यात आली होती. नोंदणी फक्त पहिल्या ३० महिलांसाठी मर्यादित असल्याने महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाबाबत माहिती देताना रोह्यातील नामवंत हृदयरोग तज्ञ डॉ. अशोक जाधव यांनी सांगितले की, महिलांमध्ये स्तन कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. वेळेवर तपासणी झाल्यास आजाराचे लवकर निदान होऊन उपचार अधिक प्रभावी ठरतात. यापूर्वीही आम्ही असेच उपक्रम राबवले असून, यापुढे दर तीन महिन्यांनी महिलांसाठी मोफत तपासणी शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमातून महिलांना निश्चितच मोठा फायदा होणार असून, ग्रामीण भागातील महिलांनी या शिबिराचा विशेष लाभ घेतल्याचेही त्यांनी नमूद केले.

या शिबिरासाठी ग्रामीण व शहरी भागातील महिलांनी या आरोग्य उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यातआले

## इंदापूरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात



**माणगाव : बातमीदार**

एस.एस.निकम इंग्लिश स्कूल, इंदापूरमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून दिपक फडणीस (माजी विद्यार्थी, अभियंता, शिक्षणतज्ञ, व आध्यात्मिक विचारवंत) उपस्थित होते.

या कार्यक्रमाला माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे पदाधिकारी, शाळेचे चेअरमन अमोल कुळकर्णी, माणगाव एज्युकेशन ट्रस्ट सदस्य, एस. एम.सी. चेअरमन संपदा कुळकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका रंजिता जाधव, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका संचिता जाधव मॅडम, पूर्व प्राथमिक विभागाच्या इन्चार्ज संपदा पाटील मॅडम, उपस्थित होते. तसेच शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे महत्त्वाचे योगदान होते. कार्यक्रमाच्या मध्यभागी सन २०२४-२५मध्ये इयत्ता दहावीच्या प्रथम व द्वितीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. व शाळेच्या विविध शैक्षणिक व सांस्कृतिकक्षेत्रांतील सहभाग, तसेच त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा सन्मान करण्यात आला. दिपक फडणीस यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणामध्ये प्रगती करावी सदैव पुढे जावे. आध्यात्मिक कार्याचा वारसा जपावा असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, **मौजे चाळ, ता. पनवेल, जि. रायगड** येथील रेव्हेन्यु रेकॉर्ड मध्ये खालील प्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे मालक श्री. साईनाथ भुऱ्या पाटील व श्रीमती. गुणाबाई चंद्रकांत काथारा यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहु मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चाळ, ता. पनवेल, जि. रायगड, येथिल खालील वर्णनाची मिळकत.**

| गावांचे नांव | भोगवटदारांचे नांव | सं.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे- चाळ, ता. पनवेल, जि. रायगड | श्री. बाळाराम भुऱ्या पाटील<br>श्री. साईनाथ भुऱ्या पाटील<br>रामुबाई सावळाराम दरे<br>मनुबाई रामा भोईर<br>गुणाबाई चंद्रकांत काथारा<br>नरेश गौतम केणी<br>करूना प्रकाश पाटील<br>अपर्णा तुकाराम पाटील | ४२/२ | ०-१५-२०<br>०-००-००<br>०-१५-२०<br>या अविभाजित क्षेत्रापैकी श्री. साईनाथ भुऱ्या पाटील व श्रीमती. गुणाबाई चंद्रकांत काथारा यांचे मालकीचे क्षेत्र ०-०७-५० | ०.४४ |
| | | ४२/३ब | ०-७२-८०<br>०-००-००<br>०-७२-८०<br>या अविभाजित क्षेत्रापैकी श्री. साईनाथ भुऱ्या पाटील व श्रीमती. गुणाबाई चंद्रकांत काथारा यांचे मालकीचे क्षेत्र ०-३६-४० | १२.३१ |

सदरहु जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचे कोणत्याही प्रकारचे तारण, गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर कोणत्याही प्रकारचे इजमेन्ट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, भाडेकरूपणाचा हक्क, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, कदार मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तिंनी, इतर वारसांनी वा संबंधितानी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत, याची संबंधितानी नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक २४/१२/२०२५

**सही/-**
**ॲड. रोहिदास हरी आगलावे**

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं. १२/ए, ग्राऊंड फ्लोर, अमोल समर्थ को.ऑ. सोसायटी, परदेशी आळी, महाराणा प्रताप रोड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र-४१०२०६, मो.न.७९७७९६७२०८


## श्रीवर्धनच्या अवधूत मंदिर परिसरात सहलींच्या गाड्या पार्किंग; उत्तर कार्यासाठी होतेय अडचण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरामध्ये मठाच्या स्मशानभूमी जवळ अवधूत मंदिर आहे. या अवधूत मंदिराचा परिसर जवळजवळ ९६ गुंठे इतका आहे. हा सर्व परिसर श्रीवर्धन शहरातील मृत पावलेल्या नागरिकांच्या उत्तर कार्यासाठी राखीव ठेवलेला आहे. या ठिकाणी दहावे, बारावे त्याचप्रमाणे सर्व प्रकारची उत्तर कार्य केली जातात. परंतु दिवसेंदिवस वाढणाऱ्या पर्यटनामुळे श्रीवर्धन मध्ये सहलीच्या येणाऱ्या बसेसची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे पार्किंगची समस्या गंभीर झालेली आहे. याच अवधूत मंदिर परिसरात सहलीच्या असंख्य बस पार्किंग करून ठेवलेल्या असतात. त्यामुळे शहरात कोणत्याही नागरिकाचे मयत झाल्यानंतर उत्तर कार्य करण्यामध्ये अडचण निर्माण होत आहे.

तसेच अवधूत मंदिर परिसरात सहल आयोजक बिनधास्तपणे जेवण बनवताना अनेक वेळा आढळून येतात. जेवण बनवून झाल्यानंतर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची साफसफाई करण्यात येत नाही. उभ्या राहिलेल्या बसमधून देखील खूप मोठ्या प्रमाणावर कचरा या मंदिर परिसरात फेकण्यात येतो. सतत या ठिकाणी येणाऱ्या सहलींच्या बसेसमुळे व जेवण बनवण्याच्या प्रकारामुळे मंदिराचे पावित्र्य धोक्यात आले आहे. श्रीवर्धन मधील अतिशय जागरूक असे हे अवधूत देवस्थान आहे. याबाबत श्रीवर्धन नगरपरिषदेचे अगोदर असलेले मुख्याधिकारी व आत्ता असलेले मुख्याधिकारी यांच्याकडे अनेक वेळा चर्चा करून त्या ठिकाणी सूचनाफलक लावावा. की कोणीही या ठिकाणी उघड्यावर अन्न शिजवू नये.

मंदिर परिसर स्वच्छ ठेवावा. मात्र नगर परिषदेकडून अशी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. एकूणच संपूर्ण श्रीवर्धन शहरामध्ये पार्किंगची समस्या अत्यंत गंभीर बनलेली असून समुद्रकिनारी असलेल्या अनेक हॉटेल्स व रिसॉर्टला कस्टमर पोहोचू शकत नाहीत. कारण समुद्राकडे येणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा चार चाकी वाहने पार्किंग केल्यामुळे संपूर्ण रस्ता जाम होऊन गेलेला असतो. काही दिवसापूर्वी श्रीवर्धनच्या र.ना. राऊत विद्यालयाच्या मागील पटांगणामध्ये तात्पुरती पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु शाळा प्रशासनाने या ठिकाणी चर खणल्यामुळे त्या ठिकाणचे पार्किंग बंद करण्यात आले आहे.

नगर परिषदेकडून कोणत्याही प्रकारची पार्किंगची सुविधा येणाऱ्या पर्यटकांसाठी उपलब्ध करून दिली जात नाही. पर्यटकांकडून पर्यटन कर वसूल केला जातो. परंतु त्यांना सुविधा शून्य प्रमाणात दिल्या जातात. याबाबत मंत्री अदिती तटकरे यांच्याजवळ देखील अनेक वेळा चर्चा करून सुद्धा या प्रकारावरती अद्याप तोडगा निघालेला नाही. श्रीवर्धन समुद्रकिनारी सुशोभीकरण केलेल्या बंधाऱ्याच्या दांडे कडील बाजूला हेलीपॅड आहे. या हेलीपॅडच्या परिसरामध्ये चार ते पाच एकर जागा वनखात्याच्या अखत्यारीतील मोकळीच आहे. या जागेवर पे ॲंड पार्कची सुविधा नगरपरिषद व वनखात्याने संयुक्तपणे करून द्यावी, अशी या ठिकाणांच्या नागरिकांची मागणी आहे.

# ऐरोली रेल्वे स्थानकानजीक भुयारी मार्गाची दुरवस्था

## जाळ्या तुटल्याने वाहनांचे नुकसान

**नवी मुंबई : बातमीदार**

ट्रान्स हार्बर मार्गावरील ऐरोली रेल्वे स्थानकानजीक महापालिकेने उभारलेल्या भुयारी मार्गाची अवस्था बिकट झाली आहे. भुयारी मार्गातील जाळ्या तुटल्या आहेत. तर पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारावर टाकण्यात आलेल्या लोखंडी जाळ्या तुटून बाहेर आल्याने वाहनचालकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपुर्वी महापालिकेने डागडुजी केली होती. मात्र, त्यानंतरही पावसाळ्यात या भुयारी मार्गात पाणी साचत आहे. तर आता पावसाळ्यानंतर भुयारी मार्गाला अवकळा आली आहे.

ऐरोली रेल्वे स्थानकानजीक भुयारी मार्गाचा वापर हा ठाणे-बेलापूरवरुन ऐरोली नाका, सेक्टर-१, २, ३, ४, ऐरोली गाव येथे येण्या-जाण्यासाठी केला जातो. तर स्टेशनला पार्क करण्यात येणारी वाहनेदेखील याचा वापर करतात. महापालिकेच्या माध्यमातून याठिकाणी वाहने आणि नागरिकांना ये-



जा करण्यासाठी भुयारी मार्ग उभारण्यात आला आहे, मात्र अवघ्या दोन वर्षात भुयारी मार्गात अवस्था बिकट झाली आहे.

भुयारी मार्गात अनेकदा रात्रीच्या अंधार असतो. स्वच्छ भुयारी मार्गात असणार्या विद्युत वाहिन्या व केबलच्या वायरी लोमकळत आहेत. दोन्ही बाजूला पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे आहेत. या गटारात माती साचली आहे. गटारावर

> **ऐरोलीतील भुयारी मार्गाची साफ सफाई, रंगरंगोटी आणि तुटलेल्या जाळया बसविण्याच्या अनुषंगाने नागरिकांनी मागणी केली आहे. त्याची दखल घेऊन लवकरच जाळया बदलून रोषणाई करण्यात येईल.**
>
> **-नैनेश बदले,**
> **सहाय्यक आयुक्त-ऐरोली विभाग**

असणार्या सिमेंटच्या जाळयात तुटल्या आहेत. अनेक ठिकाणी जाळया काढण्यात आल्याने वाहनचालकाचा तोल गेल्यास अपघात होण्याची भिती होत आहे.

भुयारी मार्गात दोन्ही बाजूला लोखंडी रॉडच्या जाळयात टाकण्यात आल्या आहे. मात्र, या जाळ खिळखिळ झाल्या आहेत. जाळीतील लोखंडी पाईप,सळई बाहेर आल्याने दुचाकी, रिक्षा, कार धडकून टायरचे नुकसार होत आहे. त्यामुळे वाहन चालक हैराण झाले आहेत. येथे माती, पिशव्या आणि कचरा देखील साठला आहे. नागरिक आणि वाहन चालकांनी पालिकेने लक्ष देऊन उपाय योजना करण्याची मागणी केली आहे.

# गव्हाण-कोपर येथे कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था, कर्मवीर विद्याप्रबोधिनी, सातारा अंतर्गत रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन गव्हाण-कोपर येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि.२४) करण्यात आले होते.




रयत शिक्षण संस्थेचे, मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सदिच्छा भेटीने आणि आशीर्वादाने सुरू झालेल्या या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी गव्हाण शाखेच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन आणि रयत शिक्षण संस्थेचे, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, रायगड विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे, गव्हाण शाखेचे स्थानिक स्कूल कमिटी सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, योगिता भगत, रयत सेवक बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, प्रा. प्रभावती ठाकूर, रायगड विभागीय कार्यालयातील ज्येष्ठ लेखनिक संतोष गुजर, कनिष्ठ लेखनिक वैभव गावंड, जागृती चिखलेकर आदी उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अध्यक्षीय भाषणातदेखील सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही विषयांतून गट निहाय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. 'गट क्र.१ -इ.५ वी ते ७ वी, गट क्र.२ -इ.८ वी ते १० वी, गट क्र.३ -इ.११ वी ते १२ वी,' अशा तिन्ही गटातून सुमारे २१० विद्यार्थ्यांनी या वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला होता. रायगड विभागाच्या सर्वच शाखेतील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला होता. वक्तृत्व स्पर्धादरम्यान रामशेठ ठाकूर साहेब यांनी प्रत्येक गटाला सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सर्व परीक्षकांनी अत्यंत चोखपणे या वक्तृव स्पर्धेचे परीक्षण केले. वक्तृत्व स्पर्धा झाल्यानंतर बक्षिस वितरण सोहळा झाला. गट निहाय प्रथम, द्वितीय तृतीय आणि उत्तेजनार्थ असे चार क्रमांक काढून त्या यशस्वी विद्यार्थ्यांना रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. बक्षिस वितरण सोहळ्या प्रसंगी रायगड विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे, सहायक विभागीय अधिकारी व्ही.यु. जगताप, गव्हाण शाखेच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर आदी उपस्थित होते.

यावर्षी पहिल्यांदाच रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन गव्हाण शाखेत करण्यात आले होते. गव्हाण शाखेच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, 'रयत'चे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. संजय उगले, प्रा. राजेंद्र चौधरी यांच्या नियोजानांतर्गत या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले तर आभार रवींद्र भोईर यांनी मानले.

# पनवेल सार्वत्रिक निवडणूक : दुसर्‍या दिवशी १९४ नामनिर्देशन पत्राची विक्री



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पनवेल सार्वत्रिक निवडणूक बुधवार, १५ जानेवारी २०२६ रोजी होत आहे, तर मतमोजणी व निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहे. निवडणूक प्रक्रियेचा पहिला महत्त्वाचा टप्पा असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेला मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे. नामनिर्देशन पत्र विक्रीच्या पहिल्या दिवशी एकुण २३३ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली होती. तर २४ डिसेंबर नामनिर्देशन पत्र विक्रीच्या दुसर्‍या दिवशी एकुण १९४ नामनिर्देशन पत्राची विक्री झाली आहे.

नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी २३ डिसेंबर ते ३० डिसेंबरदरम्यान सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. दरम्यान बुधवार २४ डिसेंबर दुसर्‍या दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय १, प्रभाग १,२ आणि ३ रोजी एकूण ५५ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०२ , प्रभाग ४,५,६ येथे एकूण २३ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०३ , प्रभाग ७,८,९,१० येथे एकूण ३७ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी अधिकारी कार्यालय ०४ कामोठे , प्रभाग ११,१२,१३ येथे एकूण ४५ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०५, प्रभाग १४,१५,१६ येथे एकूण १८ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय ०६, प्रभाग १७,१८,१९,२० येथे एकूण १६ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली.

एकूणच आज सहा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून १९४ नामनिर्देशन पत्र विक्री करण्यात आली. तर नामनिर्देशन पत्र प्राप्त संख्या शून्य आहे. नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी छाननीनंतर तत्काळ प्रसिद्ध केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक शुक्रवार, २ जानेवारी असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तर, शनिवार, ३ जानेवारी रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार असून, त्याचदिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.



# बांगलादेशात झालेल्या हिंदुंच्या हत्याकांडाचा निषेध

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यवत संघ, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष दिनेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, संघटना मजबूत करण्यासाठी एक महत्त्वाची बैठक झाली.

या बैठकीत राष्ट्रीय मजदूर संघाचे चंद्रभान भाई यांच्या नेतृत्वाखाली रमेश पटवा, सुनील साहनी, नरेश आणि लाल यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती या बैठकीत होती.

बैठकीदरम्यान, संघटना मजबूत करण्यासाठी नवीन पदांवर नियुक्ती करण्यात आली आणि लाखो लोकांच्या संरक्षण, सेवा आणि हक्कांसाठी मोहीम अधिक तीव्र करण्याचा संकल्प करण्यात आला.

ज न त ` प य ´ त पोहचण्यासाठी देशभरात शाखांचा विस्तार करण्याचे काम सुरू आहे. यानिमित्ताने बलिंदर सिंग यांची जनसंपर्क पदावर नियुक्ती करण्यात आली नथुराम यादव यांची जनसंपर्क पदावर नियुक्ती करण्यात आली.

या वेळी धर्म, समाज आणि देशाचे रक्षण करण्यासाठी खांद्याला खांदा लावून काम करणे,चांगला मार्ग अवलंबणे आणि पीडितांना सर्वतोपरी मदत करणे तसेच बैठकीत बांगलादेश मध्ये झालेल्या हिंदूंच्या हत्याकांडाचा तीव्र निषेध करण्यात आला व देशभरात आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी देशविदेशी साहित्य वाचून समृद्ध व्हावे -प्रा. वाघमारे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी देशविदेशी साहित्य वाचून आपले जीवन समृद्ध करावे' असे विचार छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले. ते पनवेल तालुक्यातील गव्हाण कोपर येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन भगत ज्युनियर कॉलेजमध्ये 'साहित्य जीवनास दिशादर्शक' या विषयावर व्याख्यान देताना बोलत होते.



या वेळी अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या, प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर या उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना साहित्याचे जीवनातील महत्व सांगण्यासाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

महात्मा जोतीराव फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींची कामगिरी वाचून प्रेरणा घ्या. वाचन आणि जीवन याचा सबंध असून त्यातूनच माणसाचे कर्तृत्व घडत असते. म्हणूनच आदर्श व्यक्तिमत्वांचे वाचन करा असे आवाहन त्यांनी केले. या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले, सांस्कृतिक विभाग प्रमुख राजेंद्र चौधरी, जयराम सोनटक्के, माणिक घरत, अर्चना पाटील आदी उपस्थित होते.

सन २०२५-२६ हे वर्ष रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, गव्हाण विद्यालयाचे आधारस्तंभ रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. या अनुषंगाने त्यांच्या जीवनावर अनेक साहित्यिक जीवन चरित्र लिहीत आहेत. त्यापैकीच प्रा. डॉ. सुभाष वाघमारे हेदेखील लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांचे आत्मचरित्र लिहिणार आहेत.

या आत्मचरित्रातून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे संपूर्ण जीवन कार्य ते उलगडणार आहेत. त्यांची ही साहित्यकृती लवकरच आपणा सर्वांच्या वाचनासाठी उपलब्ध होणार आहे. त्या दृष्टीने विद्यालयाच्या वतीने प्रा. वाघमारे यांना शुभेच्छा देण्यात आल्या आणि व्याख्यानाबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

# सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन; वार्षिक अहवालाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे ३०वे स्नेहसंमेलन आणि वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा मंगळवारी (दि.२३) झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. यतीन गांधी आणि डॉ. सोनल गांधी ह्या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख होते. अतिथी म्हणून संचालक संजय पाटील, सुशील शिवलकर, (प्राचार्य, DITE, रत्नागिरी), राहुल घरत (कार्यकारिणी सदस्य, जेबीसपी संस्था, पनवेल) माजी नगरसेवक संतोष शेट्टी, तेजस कांडपिळे, संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, ॲड. राहुल पाटील आदी उपस्थित होते.

विशेष अतिथी म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी सिद्धांत केसरकर, अर्चित घरत हे उपस्थित होतेविशेष. विशेष म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या संचालिका वर्षा ठाकूर यांची उल्लेखनीय उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजनाने झाली.



सुरेल ईशस्तवन आणि स्वागतगीत विद्यालयाच्या गायकवृंदाने सादर केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यालयाच्या संपूर्ण वर्षभरातील उपलब्धींचा आढावा घेत विद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. या प्रसंगी विद्यालयाच्या वार्षिक अहवाल नियतकालिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख पाहुणे डॉ. यतीन गांधी आणि डॉ. सोनल गांधी यांनी त्यांच्या भाषणात विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुशील शिवलकर यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना नेहमी पुढे जात राहा, यशस्वी व्हा, स्पर्धामध्ये सहभागी व्हा, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

वाय. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात आजच्या आधुनिक काळातील विद्यार्थ्यांना नमस्काराचे आणि संस्कारांचे महत्त्व पटवून देत,विद्यार्थ्यांनी स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यशस्वी व्हा, असा आशीर्वाद दिला. बक्षीस मिळालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षी प्रयत्न करा व यशस्वी व्हा, असा सल्ला दिला.

यानंतर उज्ज्वल भारत हा रंगारंग कार्यक्रम सादर केला गेला. सांस्कृतिक कार्यक्रमाचे परीक्षण करण्यासाठी नृत्य तज्ज्ञ मोकल सर आणि नेहा मॅडम यांना आमंत्रित करण्यात आले होते.

या वेळी इयत्ता आठवी क प्रथम, सातवी क द्वितीय, तर इयत्ता नववी अ, ब तृतीय असे नृत्य उत्कृष्ट म्हणून घोषित करण्यात आले.

# 'विद्याभवन'मध्ये विज्ञान वक्तृत्व स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई आणि पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन शिक्षण संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवीमुंबई स्तरीय आंतरशालेय विज्ञान वक्तृत्व स्पर्धेला नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

मराठी विज्ञान परिषद, नवी मुंबई विभागाचे अध्यक्ष, विज्ञानकथा लेखक डॉ.किशोर कुलकर्णी, प्रसिद्ध व अनुभवी बायोटेक्नॉलॉजिस्ट बिपीन देशमाने, डॉ. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे अधिकारी विजय नागले, प्रसिद्ध बायोकेमिस्ट डॉ. जयश्री सैनिस, मराठी विज्ञान परिषदेचे सक्रिय सदस्य दिनकर



पाटील आणि पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत या विज्ञान वक्तृत्व स्पर्धेला सुरुवात झाली.

ही स्पर्धा २२ ते २४ डिसेंबर दरम्यान होणार असून नवी मुंबईतील बहुतांश शाळांतील ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेच्या बरोबरच मुंबईतील नेहरू सायन्स सेंटर आणि मराठी विज्ञान परिषदेमार्फत विद्याभवन शिक्षण संकुलात विज्ञान प्रदर्शन आणि प्रात्यक्षिक सादरीकरणदेखील सर्वांसाठी निशुल्क ठेवण्यात आले आहेत.

सारस्वत को ऑपरेटिव्ह बँक या स्पर्धेची प्रयोजक आहे. या स्पर्धेचे बक्षीस वितरण शनिवार दि. २४ जानेवारी रोजी पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे व नेहरू सायन्स सेंटरचे संचालक डॉ. उमेश रुस्तागी यांच्या हस्ते होणार आहे.या स्पर्धेसाठी विद्याभवनचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, स्पर्धाकांचे पालक , विविध शाळांमधून आलेले शिक्षक उपस्थित होते. विज्ञान शिक्षिका शीतल येनगे यांनी या स्पर्धेत सूत्रसंचालन केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात गणित दिनानिमित्त कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिनानिमित्त २२ डिसेंबर रोजी गणित विभागाच्या वतीने महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजनयांच्या जीवनावर आधारित माहितीपटाचे प्रक्षेपण यशस्वीपणे पार पडले.

या उपक्रमाचे आयोजन गणित विभागातील प्रा. प्रतीक्षा पाटील यांनी केले, विभागप्रमुखडॉ. नीलम लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांचे मोलाचे मार्गदर्शन व पाठिंबा लाभला. या माहितीपटाच्या माध्यमातून रामानुजन यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाबरोबरच गणित क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाची विद्यार्थ्यांना सखोल माहिती मिळाली.

या कार्यक्रमास विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनीमोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. माहितीपटानंतर विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाबद्दल अधिक रुची निर्माण झाली असून, वैज्ञानिक विचारसरणी आणि संशोधन वृत्तीला चालना मिळाल्याचे दिसून आले.

# एमएनएम विद्यालयात राष्ट्रीय किसान दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माय मातीची सेवा करणाऱ्या शेतकरी बांधवांबद्दल कृतज्ञता दर्शविणारा राष्ट्रीय किसान दिनाचे आयोजन एमएनएम विद्यालयाच्या पूर्व प्राथमिक विभागाने साजरा केला. पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या झाडांच्या बियांची शालेय प्रांगणात रुजवणूक केली

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षण तसेच कृतीमधून प्रत्यक्ष बियांची रुजवणूक होऊन छोटे रोपटे कसे तयार होते व त्याचे झाडात रूपांतर कसे होते हे सांगितले. दिशा विशाल बोढारे या विद्यार्थिनीने किसान दिनानिमित्त भाषण केले.

पर्यवेक्षिका प्रणिता गोळे प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी विद्यार्थ्यांना किसान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका वैशाली जोशी, सुप्रिया रोकडे, प्रणाली गायकवाड यांनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

# खालापूर तहसील कार्यालयातील हिरकणी कक्ष बंद; महिलांची गैरसोय



**खोपोली : प्रतिनिधी**

तहसील कार्यालय खालापूरच्या आवारात असलेला हिरकणी कक्ष बंद झाल्याने याठिकाणी लहानग्या सह येणाऱ्या महिलांची मोठी गैरसोय होत आहे. खालापूर तहसील कार्यालयात विविध कामासाठी दररोज शेकडो नागरिक येत असतात. काम मार्गी लागेपर्यंत तहसील आवारात बसून वाट पहावी लागते.

यामध्ये अनेकदा लहान बाळांना घेऊन आलेल्या महिलांना सोयीची आणि हक्काची जागा असावी या उदात्त हेतूने पाच वर्षापूर्वी हिरकणी कक्ष बांधण्यात आला. हाय टेक बिर्ला कारखान्याकडून सामाजिक बांधिलकी म्हणून सुसज्ज हिरकणी कक्ष बांधण्यात आला. परंतु सध्या हिरकणी कक्षाच्या जागेत आधार केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे लहानग्या सह येणाऱ्या महिलांची अडचण होत आहे.त्यामुळे तो पुन्हा सुरु करण्याची मागणी होत आहे. प्रस्तुत प्रतिनिधीने तहसीलदार अभय चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु ते अलिबाग येथे गेल्याचे समजले

**तहसील कार्यालयात कामानिमित्त आल्यानंतर कधी कधी कित्येक तास बसाव लागत. अशा वेळी लहान बाळांसह आलेल्या महिला बाळाला स्तनपान करण्यासाठी शांत आणि सोयीस्कर जागा हिरकणी कक्ष होते. तिथे आधार केंद्र तिथे सुरू केल्याने लहान बाळाना घेऊन बाहेर वर्दळीच्या ठिकाणी बसाव लागत आहे.**

**–ॲड. सुजाता गायकवाड, खालापूर**

## नांदगाव ग्रामपंचायत उपसरपंच मेघा मापगावकर शिवसेनेत दाखल

**मुरुड : प्रतिनिधी**

नांदगाव गावात जास्तीत जास्त विकास कामे व्हावीत तसेच लोकांची अडलेली कामे मार्गी लागावीत यासाठी ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव उप सरपंच मेघा महेश मापगावकर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते महेश मापगावकर,

प्रथमेश मापगावकर, मनाली मकू, दांडे गावातील–दिनेश कुमरोटकर आदी सह कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गट मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. सामाजिक कार्यकर्ते महेश मापगावकर यांच्यासारखे कार्यकर्ते शिवसेनेत असावे यासाठी शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे यांच्यासह

,जितेंद्र दिवेकर,विशाल पाटील, योगेश जयस्वाल,



अशोक पाटील आणि नांदगाव शिवसेना कार्यकर्ते यांनी प्रमुख भूमिका बजावली आहे. त्याचा पक्ष प्रवेश आमदार महेंद्र दळवी यांच्या निवासस्थानी झाला. यावेळी या पक्ष प्रवेशाबाबत बोलताना आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, नांदगाव मधील मापगावकर कुटुंब जी अभिलाषा ठेऊन पक्ष प्रवेश केला आहे. त्याचा कधीही अपेक्षा भंग होणार नाही. नांदगाव गावच्या विकासासाठी मोठा निधी देणार असून गावच्या विकासाला प्रथम प्राधान्य देणार आहे. लोकांच्या समस्या सोडवणे हे आमचे आद्य कर्तव्यच आहे. परंतु विकास कामांसाठी सुद्धा मोठा निधी देणार असून नांदगाव लवकरच विकासाची कामे झालेली पहावयास मिळणार आहेत. यावेळी आमदार दळवी यांनी उपसरपंच व सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# जिल्हा टीबी फोरम समन्वय समितीची रायगड जिल्हास्तरीय बैठक

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात क्षयरोग निर्मूलनासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा टीबी फोरम तसेच टीबी को–मॉर्बिडीटी समन्वय समितीची जिल्हास्तरीय बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली.

या वेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. अक्षयराज राठोड, डॉ. नालंदा पवनारकर, डॉ. प्रसाद वाईगणकर, डॉ. प्रदीप पोतदार, डॉ. विकास पवार, श्री. संजय माने, श्रीमती



रेश्मा संकपाळ यांच्यासह विविध सामाजिक संस्था व कॉर्पोरेट क्षेत्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत टीबी मुक्त ग्रामपंचायत उपक्रमाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गेल्या वर्षी सिल्वर दर्जा प्राप्त केलेल्या ५६ ग्रामपंचायतींना यंदा गोल्ड दर्जा मिळावा तसेच जास्तीत जास्त ग्रामपंचायती टीबी मुक्त घोषित व्हाव्यात, या दृष्टीने प्रभावी प्रयत्न करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

टीबी रुग्णांच्या तपासणीसाठी आवश्यक असलेल्या चिप्स व कारटेजेसची कमतरता लक्षात घेता, त्यांची मुबलक उपलब्धता करून देण्यासाठी जिल्ह्यातील सामाजिक संस्था व कॉर्पोरेट कंपन्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच अधिकाधिक संस्थांनी निक्षय मित्र म्हणून पुढे येऊन रुग्णांना पोषक आहाराचे फूड बास्केट उपलब्ध करून द्यावेत, ज्यामुळे रुग्ण लवकर बरे होऊन कुटुंब व समाजात टीबीचा प्रसार रोखण्यास मदत होईल, असेही बैठकीत नमूद करण्यात आले.

बैठकीची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांनी दिली. तसेच जागृती गुंजाळ, प्रिया नारकर, पंकज पाटील तर कॉर्पोरेट क्षेत्रातून लहु रोन्दल, नंदिनी मंदेराई, मंगेश पाटील, दत्तात्रेय शिंदे, दंतराव सतीश, विजय वाघमारे, किर्तीकांत पाटील, प्रमोद नाईक आदी उपस्थित होते.

# आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच; निजामपूर विभागातील भाले व शिरवली सरपंचांचा खुलासा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागात सध्या आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या पूर्वतयारी ला जोरदार वेग आला आहे. त्यामध्ये अनेक गाव वाड्या वस्त्या यांचे पक्ष बदलासह पक्ष प्रवेश होत आहेत. तर काहींचे पक्षप्रवेश आणि पक्षबदल होणार अशा चर्चा नाक्यानाक्यावर दबक्या आवाजात सुरू आहेत. या चर्चांमध्ये निजामपूर विभाग यामध्ये अग्रेसर ठरला आहे. यामध्ये निजामपूर विभागातील भाले ग्रामपंचायत चे सरपंच दत्ताराम खांबे शिरवली ग्रामपंचायतचे सरपंच सदानंद पानसरे हे राष्ट्रवादी काँग्रेस सोडून इतर पक्षात प्रवेश करणार अशा चर्चा निजामपूर



विभागात सुरू होत्या. मात्र या दोन्ही सरपंचांनी २४ डिसेंबर रोजी निजामपूर येथे पत्रकार परिषद घेत या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

या पत्रकार परिषदेत भाले सरपंच दत्ताराम खांबे व शिरवली सरपंच सदानंद पानसरे म्हणाले की,आम्ही खासदार सुनिल तटकरे ना.आदिती तटकरे तसेच जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा महाड विधानसभा मतदार संघाचे माजी अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये ठाम आहोत. विरोधकांना आता काही मुद्दे उरले नसल्याने आमच्या पक्षप्रवेशाच्या अफवा पसरविल्या जात आहेत. आम्ही कालही राष्ट्रवादी मध्ये होतो आणि आजही राष्ट्रवादी मध्ये आहोत. आणि उद्या देखील राष्ट्रवादी मध्येच राहणार आहोत असे मत पत्रकार परिषदेत व्यक्त केले आहे.

या पत्रकार परिषदेला भालेसरपंच दत्ताराम खांबे,शिरवली सरपंच सदानंद पानसरे,महाड विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष बाबुशेठ खानविलकर,निजामपूर विभाग राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तुकाराम सुतार,भाले उपसरपंच प्रकाश शेपुंडे,ग्रामपंचायत सदस्य सुभाष राणे,जेष्ठ नेते जनार्दन शिळीमकर,राष्ट्रवादी युवक काँग्रेस नेते संजोग एकनाथ मानकर निजामपूर विभागातील राष्ट्रवादी ज्येष्ठ व युवा पदाधिकारी उपस्थित होते.

# लोकनेते अशोकदादा साबळे पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात सहकार क्षेत्रात विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाणारी लोकनेते अशोक दादा साबळे पतसंस्था यांच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन अत्यंत उत्साहात व साधेपणाने पार पडले.

सोमवार,२२ डिसेंबर रोजी पतसंस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात व्हाइस चेअरमन प्रशांत साबळे यांच्याहस्ते दिनदर्शिकेचे अनावरण करण्यात आले.

या प्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन अरुण पवार,व्हाइस चेअरमन प्रशांत साबळे,सेक्रेटरी संजय ओसवाल,सल्लागार सुरेश जैन,ज्येष्ठ संचालक महादेव



कनोजे,हेमंत शेठ,दिलीप कांबळे,व्यवस्थापक मनोज मुंडे,वसुली अधिकारी बाळासाहेब पवार,ज्येष्ठ लिपिक विजय जाधव,कॅशियर सुखदा धुमाळ,तसेच निलेश रातवडकर,बाबू कळमकर,सुमित पारखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकनेते अशोक दादा साबळे पतसंस्थेने आपल्या कार्यकाळात सहकार क्षेत्रात आदर्शवत वाटचाल केली असून यंदा संस्थेच्या स्थापनेला २३ वर्षे पूर्ण झाली आहेत.

विशेष म्हणजे स्थापनेपासून आजपर्यंत सतत नफ्यात राहणारी रायगड जिल्ह्यातील एकमेव पतसंस्था म्हणून या संस्थेचा लौकिक आहे. सध्या संस्थेचे ४२ कोटी रुपयांचे भागभांडवल, सुमारे १० कोटी रुपयांच्या ठेवी असून वार्षिक उलाढाल ४१ कोटी रुपये इतकी आहे.

या २३ वर्षांच्या यशस्वी प्रवासात संस्थेने हजारो बेरोजगार युवक–युवतींना स्वतः चा व्यवसाय उभारण्यासाठी कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ देत सामाजिक बांधिलकी जपली आहे.

यावेळी बोलताना चेअरमन अरुण पवार यांनी सांगितले की, यंदाची दिनदर्शिका अत्यंत आकर्षक, सुबक व माहितीपूर्ण स्वरूपात तयार करण्यात आली असून ती सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, उद्योजक, नोकरदार, गृहीणी तसेच विद्यार्थी वर्गासाठीही उपयुक्त ठरेल.

दिनदर्शिकेच्या प्रकाशनानिमित्त उपस्थित मान्यवरांनी पतसंस्थेच्या कार्याचा गौरव करत पुढील काळातही ही संस्था सहकार क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करेल, असा विश्वास अध्यक्षांनी व्यक्त केला.

## जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना घडले पुणे दर्शन

**मुरूड : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा मजगाव मराठी शाळेची शैक्षणिक सहल नुकतीच पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

सहलीत इयत्ता पाचवी ते सातवी मधील ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या सहली दरम्यान विद्यार्थ्यांनी पुण्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी दिल्या. सर्प उद्यान, प्रति बालाजी, प्रति शिर्डी या ठिकाणांना विद्यार्थ्यांनी भेट देवून इतिहास व संस्कृतीची प्रत्यक्ष अनुभूती घेतली. शिक्षकांनी विविध स्थळांची माहिती समजावून सांगितली

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना ज्ञान वाढण्यासोबतच शिस्त, सहकार्य व सामाजिक जाणीवही विकसित झाली.

सहल यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ, सहल प्रमुख चेतन चव्हाण, शिक्षक वृंद बाळासाहेब फुंदे, हर्ष नांदगावकर, संतोष दहातोंडे, स्वप्नाली बाजी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.



# रातवड विद्यालयाची कोकण दर्शन शैक्षणिक सहल उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ,कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाची कोकण दर्शन शैक्षणिक सहल शनिवार दि.२० डिसेंबर ते रविवार दि. २१ डिसेंबर या कालावधीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

या शैक्षणिक सहलीत विद्यार्थ्यांनी लोटे परशुराम, गणपतीपुळे, मार्लेश्वर, डेरवण व रत्नागिरी आदी कोकणातील प्रेक्षणीय, धार्मिक, ऐतिहासिक तसेच साहित्यिक स्थळांना भेटी दिल्या. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कोकणातील ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक वारशाची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची संधी मिळाली. सहलीत एकूण ८० विद्यार्थी–विद्यार्थिनी सहभागी झाले होते. त्यांच्या सोबत सहा शिक्षक व दोन पालक यांनी जबाबदारीने सहभाग घेतला. सहल प्रमुख म्हणून भिवा पवार यांनी उत्तम नियोजन केले असून ही सहल मुख्याध्यापक संतोष कदम यांच्या मार्गदर्शनानुसार यशस्वीरीत्या पार पडली.

संपूर्ण सहल कालावधीत शिस्त,सुरक्षितता व शैक्षणिक उद्देश यांचे काटेकोर पालन करण्यात आले. प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थी अत्यंत आनंदी व उत्साही दिसून आले. ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी निश्चितच उपयुक्त ठरली आहे.




## उमेश पाटील कर्जतचे नवीन पोलीस निरीक्षक



**कर्जत :** कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांची श्रीवर्धन पोलीस ठाण्यात बदली झाली असून त्यांच्या रिक्त जागेवर उमेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाटील हे श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होते.

ही खांदेपालट झाली असली तरी भोसले यांची सहा महिन्यातच बदली झाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



**तळा : गिरणे गावची चवळी कोकणात प्रसिद्धी ओलावा व दवबिंदूंवर पिकणारी ही चवळी चविष्ट तळा –प्रतिनिधी तळा तालुक्यातील खाडी किनारी असणाऱ्या गिरणे गावची चवळी आता महाराष्ट्रत प्रसिद्धीस येत आहे. अनेक ठिकाणावरून आतापासूनच येथील या चळवळीला व्यापाऱ्यांकडून मागणी होताना पहावयास मिळत आहे. खाडी किनारी असणाऱ्या या गावातील शेतकरी वर्ग गेल्या अनेक वर्षांपासून पारंपारिक पध्दतीने चवळीचे पिक.**

# मुंबईचा सिक्कीवर एकहाती विजय

## रोहित शर्माचा ९४ चेंडूत १५५ धावांचा तडाखा




**मुंबई : प्रतिनिधी**

दिग्गज क्रिकेटपटू रोहित शर्मा सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. पुढील महिन्यात भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघात तीन सामन्यांची वनडे मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेसाठी लवकरच संघ जाहीर केला जाणार आहे. रोहित शर्माने त्याआधीच आणखी एक स्फोटक शतक झळकावले आहे. तो सध्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये शार्दुल ठाकूरच्या नेतृत्वाखाली मुंबईकडून खेळत आहे. त्याच्या खेळीच्या जोरावर मुंबईने सिक्कीमविरुद्ध ८ विकेटने दणदणीत विजय मिळवला.

विजय हजारे ट्रॉफी सुरु झाली आहे. मुंबईचा सामना सिक्कीमशी आहे. रोहित शर्मा सलामीवीर फलंदाज म्हणून आला आणि त्यानं शतक झळकावलं. प्रथम त्यानं २७ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं आणि नंतर फक्त ६२ चेंडूत आणखी एक शतक झळकावलं. रोहित शर्मा अजिबात दबावाखाली दिसत नव्हता. तो येताच त्याने त्याच्या नेहमीच्या शैलीत चौकार आणि षटकार मारण्यास सुरुवात केली. उल्लेखनीय म्हणजे, जेव्हा रोहितनं १०० धावा केल्या तेव्हा त्यानं चौकार आणि षटकारांसह ८० धावा केल्या होत्या. शतकानंतरही रोहितची आक्रमक फलंदाजी सुरुच होती. रोहितने आपल्या खेळीत ९४ चेंडूत १५५ धावा काढल्या. यात त्यानं १८ चौकार आणि ९ उत्तुंग षटकार मारण्यात यश मिळवलं. लिस्ट ए क्रिकेटमध्ये रोहितचं हे ३७ वं शतक होते.

सचिन तेंडुलकर हा लिस्ट ए क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं झळकावणारा फलंदाज आहे. त्यानं ५३८ डावांमध्ये ६० शतकं झळकावली आहेत. या यादीत विराट कोहली ५८ शतकांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. रोहित आता या यादीत सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. सचिन आणि कोहली व्यतिरिक्त फक्त ग्रॅहम गूच, ग्रीन हिक आणि कुमार संगकारा हे रोहितच्या पुढं आहेत. जर रोहितचा फॉर्म असाच राहिला तर तो लवकरच टॉप तीनमध्ये आपले स्थान पक्कं करू शकेल.

### रोहित शर्मा २०२७ च्या वनडे विश्वचषकात खेळणार

रोहित शर्मानं आता टी-२० आंतरराष्ट्रीय आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे, त्यामुळं त्याचं लक्ष आता केवळ वनडे क्रिकेटवर आहे, मग ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट असो किंवा विजय हजारे ट्रॉफी. त्याचं लक्ष्य २०२७ चा वनडे विश्वचषक आहे, ज्यासाठी त्यानं आधीच तयारी सुरू केली आहे. रोहित विजय हजारे ट्रॉफीमध्ये यानंतर आणखी एक सामना खेळेल अशी अपेक्षा आहे.

# पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंना तीन रौप्यपदके

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

इंदूर मध्यप्रदेश येथे १९ ते २१ डिसेंबर २०२५ या कालावधीत पश्चिम भारत विभागीय क्लासिक राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियन स्पर्धा पार पडली. यामध्ये महाराष्ट्राच्या संघातून रायगडचे तीन खेळाडू सहभागी झाले होते. यामध्ये सब ज्युनिअर, ज्युनिअर आणि सिनिअर स्पर्धा झाली.

यामध्ये ज्युनिअर मुली मध्ये ४३किलो वजनी गटात सार्वजनिक व्यायाम शाळा, वाढगांव (अलिबाग) सुहानी मंद संतोष गावडे हिने १६७.५किलो वजन स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात उचलून २रा क्रमांक मिळवलाआणि रौप्य पदक जिंकले. तर ४७ किलो वजनी सीनियर गटात रायगडची आंतरराष्ट्रीय खेळाडू अमृता माधुरी ज्ञानेश्वर भगत, पॉवर हाऊस क्लब खोपोली हिने ३०५, किलो वजन स्कॉट बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट यामध्ये उचलून दुसरा क्रमांक मिळवला आणि रौप्य पदक जिंकले. तर मुलांच्या ८३ किलो वजनी गटात पेणच्या संसारे फिटनेसच्या अथर्व ज्योती मुकेश लोधी यानेसुद्धा ६४२.५ किलो वजन स्कॉट बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात उचलून २रा क्रमांक मिळवला आणि रौप्य पदक जिंकले.



या स्पर्धेत तिन्ही खेळाडू रौप्य पदकाचे पदकाचे मानकरी झाले. याबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोशियन रायगडचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक, कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल, सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव, कार्यकारणी सदस्य सुभाष टेंबे, संदीप पाटकर, मानस कुंटे (अलिबाग), खजिनदार राहुल गजरमल, सचिव अरुण पाटकर, उपाध्यक्ष सुभाष भाटे यांनी आनंद व्यक्त केला आहे आणि खेळाडूंच्या प्रशिक्षकांचेही अभिनंदन केले आहे.

# भारतीय महिला संघाचा सलग दुसरा विजय

## शफालीचे धमाकेदार अर्धशतक



**विशाखापट्टणम : वृत्तसंस्था**

शफाली वर्माच्या तुफानी फटकेबाजीच्या जोरावर भारतीय महिला क्रिकेट संघाने श्रीलंकेला दुसऱ्या टी २० सामन्यातही धूळ चारली. शेफाली वर्माने या सामन्यात ३४ चेंडूत नाबाद ६९ धावांची वादळी खेळी साकारली.

भारताला विजयासाठी १२९ धावांची गरज होती. स्मृती मानधना आणि शफालीने संघाला दमदार सुरुवात करून दिली. स्मृती १४ धावा करून बाद झाली. त्यानंतर गेल्या सामन्यात अर्धशतक झळकावणारी जेमिमा रॉड्रिग्स फलंदाजीला आली. जेमिमानेही जोरदार फटकेबाजी केली, पण या सामन्यात तिला अर्धशतक झळकावता आले नाही. ही कसर यावेळी भरून काढली ती शफाली वर्माने. धमाकेदार फटकेबाजी करत तिने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्यामुळेच भारताला दुसऱ्या टी-२० सामन्यात दमदार विजय साकारता आला.

शेफालीने धडाकेबाज फटकेबाजी करत श्रीलंकेच्या गोलंदाजांना आपल्यासमोर लोटांगण घालायला भाग पाडले आणि भारताने श्रीलंकेला सात विकेट्स आणि ४९ चेंडू राखून पराभूत केले. पाच सामन्यांच्या मालिकेतील भारताचा हा सलग दुसरा विजय आहे.



# आवास येथे क्रीडा स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील बा.ना. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज आवास येथे भव्य क्रीडा स्पर्धेला शुभारंभ झाला. स्पर्धेचे ध्वजारोहण संस्थेचे अध्यक्ष रणजीत राणे, शाळेचे माजी विद्यार्थी तथा रायगड पोलीस धर्मेंद्र वर्तक व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

संस्थेचे सेक्रेटरी प्रभाकर म्हात्रे, विद्यालयाचे प्राचार्य ए.बी. दारकुंडे, भगत, गणेश राणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# बिहारने विजय हजारे ट्रॉफीत रचला इतिहास

**मुंबई : प्रतिनिधी**

बिहार संघाने विजय हजारे ट्रॉफीमध्ये वर्ल्ड रेकॉर्ड करत सर्वांचे लक्ष वेधले आहे. विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील सामने आजपासून खेळवले जात आहेत. या स्पर्धेत बिहार आणि अरूणाचल प्रदेश यांच्यातील सामन्यात फलंदाजांनी खोऱ्याने धावा करत अनेक विक्रम केले आहेत. या विक्रमांनंतर संघाने मोठी धावसंख्या उभारली.

विजय हजारे ट्रॉफी ही देशांतर्गत स्पर्धा असली तरी बिहार संघाने केलेला पराक्रम हा एक जागतिक विक्रम आहे. प्रथम, वैभव सूर्यवंशीने धमाकेदार शतक पूर्ण केलं, त्यानंतर बिहारचा कर्णधार साकिबुल गनीने विक्रमी शतक ठोकलं. यासह,

### ७२ वर्षांत अशी कामगिरी करणारा पहिलाच संघ

संघाने जागतिक क्रिकेटमध्ये एक नवा इतिहास रचला आहे.

विजय हजारे ट्रॉफी ही ५० षटकांचा सामना असलेली स्पर्धा आहे आणि म्हणूनच तो एकदिवसीय सामना मानला जातो. हा आंतरराष्ट्रीय सामना नाही, परंतु तो लिस्ट ए क्रिकेटमध्ये मोडतो. या स्पर्धेत, अरुणाचल प्रदेशविरुद्ध खेळताना, बिहार संघाने ५० षटकांत फक्त सहा गडी गमावून ५७४ धावा केल्या. ५० षटकांच्या क्रिकेटमध्ये एकाच डावात एवढी मोठी धावसंख्या कधीच झाली नव्हती. आंतरराष्ट्रीय





सामने दूरच पण देशांतर्गत क्रिकेटमध्ये कोणत्याही संघाला एवढी मोठी धावसंख्या उभारता आली नव्हती.

बिहारच्या ५७४ धावा आता लिस्ट ए क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्या बनल्या आहेत, ज्याने तामिळनाडूचा विक्रम मोडला आहे. २०२२ मध्ये तामिळनाडूने दोन विकेट गमावून ५०२ धावा केल्या होत्या. मनोरंजक म्हणजे, जेव्हा ५०० पेक्षा जास्त धावा झाल्या तेव्हा दोन्ही वेळा विरोधी संघ अरुणाचल प्रदेश होता.

लिस्ट ए क्रिकेटची सुरुवात १९६३ मध्ये झाली. ७२ वर्षांत कोणत्याही डावात ५५० किंवा त्याहून अधिक धावा झाल्या नव्हत्या. तमिळनाडूने यापूर्वी लिस्ट ए क्रिकेटमध्ये फक्त एकदाच ५०० पेक्षा जास्त धावा केल्या होत्या. २०२२च्या विजय हजारे ट्रॉफीमध्येही हाच विक्रम झाला होता. आता, तीन वर्षांनंतर, अरुणाचल प्रदेशविरुद्ध प्लेट ग्रुप सामन्यात बिहारने हा विक्रम मोडला आहे.

# रायगड जिल्हा परिषदेने जिंकला टाटा स्टील फ्रेंडशिप क्रिकेट कप



**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद यांनी टाटा स्टील फ्रेंडशिप कप क्रिकेट टूर्नामेंट जिंकताना रायगड पोलीस अधीक्षक संघाला हरविले. खालापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी संघाचे नेतृत्व केले.

खालापूर तालुक्यातील टाटा स्टील कंपनीने शासकीय अधिकारी, कर्मचारी, पोलीस यांच्यासाठी टाटा स्टील फ्रेंडशिप क्रिकेट कप या स्पर्धेचे आयोजन टाटा स्टील टाउनशिप सावरोली येथे केले होते. रायगड जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी कार्यालय यांनी यात सहभाग घेतला होता. या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन खालापूर अभय चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, गट विकास अधिकारी संदीप कराड यांनी केले. या वेळी चीफ सी.आर.एम.आणि ट्यूब टाटा स्टील शशी भूषण, हेड कॉर्पोरेट रिलेशन टाटा स्टील एन.सी.महापात्रा, हेड ह्यूमन रिसोर्स टाटा स्टील आशिष सोळुंखी, सीनियर एरिया मैनेजर कॉर्पोरेट रिलेशन टाटा स्टील सौरभ शर्मा, यूनिट लीड टाटा स्टील फाउंडेशन भावेश रावल उपस्थित होते. अंतिम सामना रायगड जिल्हा परिषद आणि रायगड पोलीस अधीक्षक यांच्यात होऊन रायगड जिल्हा परिषदेने या फ्रेंडशिप क्रिकेट कपवर नाव कोरले.

रायगड पोलीस यांनी प्रथम फलंदाजी करत १५ ओव्हर मध्ये सात विकेट देऊन १६७ धावा जमवल्या. उत्तरादाखल मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांनी मात्र ९ ओव्हर्स मध्ये १ विकेटच्या बदल्यात १६८ धावा बनवल्या आणि टाटा स्टील फ्रेंडशिप कप क्रिकेट टूर्नामेंट २०२५ वर नाव कोरले. या वेळी सर्वोत्तम गोलंदाज नितीन सांगळे, सर्वोत्तम फलंदाज किरण डोंगरे रायगड जिल्हा परिषद टीम हे ठरले. टाटा स्टील फ्रेंडशिप कप क्रिकेट टूर्नामेंट २०२५चे संचालन कॉर्पोरेट रिलेशन डिपार्टमेंट यांनी केले.

# कबड्डी स्पर्धेत आपटवणे संघ विजेता

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे शहरात वास्तव्यास असलेल्या सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे या संस्थेच्या आयोजित तालुकास्तरीय क्रीडा महोत्सव अंतर्गत कबड्डी स्पर्धा श्री मावळी मंडळ मैदान येथे उत्साहात झाली. अंतिम सामना ॐ काळभैरव क्रीडा मंडळ आपटवणे विरुध्द भैरवनाथ क्रीडा मंडळ वावे यांच्या झाला. यामध्ये आपटवणे संघाने बाजी मारत विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन क्रीडांगण क्रमांक एकवर माजी नगरसेवक नारायण पवार यांच्या, तर क्रीडांगण क्रमांक दोनवर ठामपा परिवहन सदस्य राजेश मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांनी श्रीफळ वाढविले. स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग घेतला. द्वितीय क्रमांक नाथभैरव क्रीडा मंडळ, झाप संघ तृतीय, तर भैरवनाथ क्रीडा मंडळ नागशेत या संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.



सकाळपासून सुरू असलेल्या या क्रीडा सोहळ्यात आमदार संजय केळकर, आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे, माजी नगरसेवक भाई खाडे, संजय सोनार, भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस राजेश मापारा, जिल्हा बँकेचे संचालक सुरेश खैरे, उद्योजक सचिन साजेकर, ओमकार साजेकर, महेश कदम आदींसह अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवत शुभेच्छा दिल्या.

क्रीडा सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष वसंत लहाने, सल्लागार विठ्ठल खेरटकर, शिवाजी दळवी, सुधीर मांढरे, गणपत डिगे, सुरेश शिंदे, रमेश सागळे, चंद्रकांत बेलोसे, प्रवीण तेलंगे, कार्याध्यक्ष प्रकाश शिलकर, सरचिटणीस राजू पातेरे, चिटणीस अविकांत साळुंके, खजिनदार विजय पवार, उपखजिनदार विजय जाधव, शिक्षण समितीप्रमुख अनिल सागळे, संपर्कप्रमुख सुनिल तिडके, क्रीडा समितीप्रमुख राकेश थोरवे, अंतर्गत हिशेब तपासनीस दत्ता सागळे, प्रसिद्धीप्रमुख अजय जाधव, सांस्कृतिक कार्यप्रमुख जनार्दन घोंगे, आरोग्य समितीप्रमुख राजेश बामणे, उपसांस्कृतिकप्रमुख रघुनाथ इंदुलकर, कार्यकारी सदस्य गजानन जंगम, उपशिक्षण समितीप्रमुख श्याम बगडे, उपक्रीडासमिती प्रमुख जयगणेश दळवी, कार्यकारी सदस्य बबन चव्हाण, पत्रकार दत्ता दळवी, कार्यकारी सदस्य भगवान तेलंगे, रमेश तेलंगे, सखाराम हुले, हरिश्चंद्र मालुसरे, प्रकाश वाघमारे, प्रवीण बामणे यांनी परिश्रम घेतले. या वेळी जयेश गाला यांनी छायाचित्रण व युट्युब लाईव्ह प्रक्षेपण केल्याने सुधागडवासी आणि ठाणेकरांना क्रीडा स्पर्धेचा आनंद घेतला आला.

# टी-२० क्रिकेटमध्ये सहा चेंडूत पाच बळी घेऊन इतिहास रचला

## 'या' खेळाडूनं केला विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये, एका गोलंदाजानं दोन किंवा तीन बळी घेणं ही एक मोठी घटना मानली जाते. हे सहसा सर्वात लहान स्वरुपात दिसून येत नाही. मात्र, क्रिकेट हा अनिश्चिततेचा खेळ आहे, जिथं कधीही काहीही होऊ शकतं. आता, टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये, एका गोलंदाजानं अर्ध्या संघाला बाद करुन खळबळ उडवून दिली आहे. २३ डिसेंबर रोजी इंडोनेशिया आणि कंबोडिया यांच्यात खेळल्या गेलेल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात ही अनोखी घटना घडली. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच एका गोलंदाजानं पाच बळी घेऊन




इतिहास रचला आहे.

खरं तर, इंडोनेशिया आणि कंबोडिया यांच्यात आठ सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळली जात आहे, जी २३ डिसेंबर रोजी बाली इथं सुरु झाली. पहिल्या टी-२० मध्ये कंबोडियानं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. धर्मा केसामाच्या धमाकेदार शतकाच्या जोरावर इंडोनेशियानं १६७/५ धावा केल्या. धर्मा केसामानं ६८ चेंडूत ८ चौकार आणि ६ षटकार मारुन ११० धावा केल्या. केसामा शेवटपर्यंत नाबाद राहिला.

इंडोनेशियाच्या धावसंख्येचा पाठलाग करताना, कंबोडियाचा संघ १४.३ षटकात १०४ धावांतच गारद झाला. १६व्या षटकात गोलंदाजी सुरु करणाऱ्या २८ वर्षीय गेडे प्रियांदनानं पहिल्या तीन चेंडूत विकेट घेत हॅटट्रिक घेतली. गेडे एवढ्यावरच थांबला नाही. चौथ्या चेंडूवर डॉट बॉल टाकल्यानंतर, गेडेनं षटकाच्या पाचव्या आणि शेवटच्या चेंडूवर विकेट घेत एका षटकात ५ विकेट घेण्याचा विक्रम केला. या सामन्यापूर्वी पुरुष किंवा महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कोणत्याही गोलंदाजानं एका षटकात ५ विकेट घेतल्या नव्हत्या हे जाणून आश्चर्य वाटले. आता, गेडे प्रियांदनानं पुरुष आणि महिला दोन्ही गटात हा विक्रम करणारा पहिला गोलंदाज बनला आहे.

गेडे प्रियांदनानं त्याच्या ऐतिहासिक षटकात फक्त एक वाइड टाकला. इंडोनेशिया आणि कंबोडिया यांच्यातील पहिल्या टी-२० सामन्यापूर्वी, टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये गोलंदाजांनी १४ वेळा एका षटकात चार बळी घेतले होते. मात्र, यापूर्वी दोन गोलंदाजांनी टी-२० क्रिकेटमध्ये एका षटकात पाच बळी घेण्याचा पराक्रम केला आहे. २०१३-१४ च्या विजय दिन टी-२० कपमध्ये यूसीबी-बीसीबी इलेव्हनकडून खेळणाऱ्या अल-अमीन हुसेननं अबहानी लिमिटेडविरुद्ध एका षटकात पाच बळी घेतले. तर २०१९-२० च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत कर्नाटकच्या अभिमन्यू मिथुननं हरियाणाच्या पाच फलंदाजांना बाद केलं होतं.

# अमोल मुझुमदार यांचा सल्ला ठरला मोलाचा -शफाली वर्मा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेवर दणदणीत विजय साकारला. भारताच्या या विजयाची शिल्पकार ठरली ती शफाली वर्मा. शफालीने या सामन्यात धमाकेदार अर्धशतक झळकावले. सामना संपल्यावर संघाचे प्रशिक्षक असलेल्या अमोल मुझुमदार यांनी सांगितलेली गोष्ट टर्निंग पॉइंट ठरली, हे शफालीने सांगितले.

शफालीने या सामन्यात फक्त ३४ चेंडूत ११ चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर नाबाद ६९ धावांची खेळी साकारली. शफाली सामना संपल्यावर म्हणाली की, सुरुवातीपासून चेंडू चांगला बॅटवर येत होता. त्यामुळे मी मैदानात मोठे फटके मारायला सुरुवात केली तरी, मी हवेतमधून जास्त फटके मारले नाही. जमिनीलगत फटके खेळण्यावर माझा भर होता. सुरुवातीला मी जेव्हा फलंदाजीला यायचे, तेव्हा मी आक्रमक फटकेबाजी करून लवकर बाद व्हायचे, पण आक्रमक फटकेबाजी करूनही अखेरपर्यंत उभं



राहून सामना कसा संघाला जिंकवून देता येऊ शकतो, हे मला अमोल सरांनी सांगितलं होतं.

अमोल सरांच्या या गोष्टीचा मला चांगलाच फायदा झाला आणि तो माझ्यासाठी टर्निंग पॉइंट ठरला आहे. मी क्रिकेटमधून बरचं काही शिकत आहे. अनुभव हा माझा गुरु आहे, कारण अनुभवामुळे माझ्या फलंदाजीत मोठा फरक पडला आहे. दिवसेंदिवस माझ्या खेळात बदल होत आहे, माझा फिटनेसही वाढला आहे. त्यामुळे यापुढेही भारताला सामना कसा जिंकवून देता येऊ शकतो, याचा विचार डोक्यात कायम असेल, असेही शफालीने सांगितले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com